

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | सोमवार | दि. १९ ऑक्टोबर २०२६ | अंक १३३ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

विकणे आहे

अलिबाग ब्राह्मणआळी युनियन बँकेशेजारील नवीन इमारतीमधील ९५० स्क्वे. फूट क्षेत्रफळाचा व्यापारी गाळा विकणे आहे.

मोहनिश जोग
मो.9970666203



निवडक



इप्का लॅबोरेटरीज कंपनीला टाळे

महाड : महाड एमआयडीसीमधील इप्का लॅबोरेटरीज कंपनीला मध्यरात्रीच्या सुमारास अचानक टाळे लावण्यात आल्याचा आरोप कामगारांकडून करण्यात येत आहे. कंपनी व्यवस्थापनाच्या या कथित निर्णयामुळे कामगारांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता कंपनी स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतल्याचा आरोप कामगारांकडून केला जात असून, या निर्णयामुळे कामगारांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कामगारांना विश्वासात न घेता आणि अंधारात ठेवून हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोपही करण्यात येत आहे. व्यवस्थापनाने योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा न्याय मिळवण्यासाठी उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला तरी मागे हटणार नाही, असा इशारा कामगारांनी दिला आहे. दरम्यान, अचानक घडलेल्या या प्रकारामुळे कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक कामगारांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह या नोकरीवर अवलंबून असताना, कंपनीच्या या निर्णयाचा त्यांच्या आयुष्यावर नेमका काय परिणाम होणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. कंपनी व्यवस्थापनाने कामगारांना विश्वासात घेतले होते का? कंपनी स्थलांतरित करण्यामागचे नेमके कारण काय? आणि कामगारांच्या रोजगाराबाबत व्यवस्थापनाची भूमिका काय आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे आता कंपनी व्यवस्थापनाच्या भूमिकेनंतरच स्पष्ट होणार आहेत. कामगारांच्या न्याय्य मागण्यांवर व्यवस्थापन काय निर्णय घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी इत्क कंपनीचे ठिय्या आंदोलन करणारे कामगार वर्ग उपस्थित होते.

कल्हेगावात लोखंडी रॉडने मारहाण

नवीन पनवेल : दारू पिऊन कामावर येण्यास मनाई केली असता लोखंडी रॉडने मारहाण केल्याचा प्रकार कल्हेगाव येथे घडला या प्रकरणी विनोद श्रावण पवार (रा.कल्हेगाव) यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात सोळा ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. विनोद पवार याला दारू पिऊन कामावर येण्यास रमेश वाघमारे यांनी मनाई केली. त्या रागातून विनोद याने लोखंडी रॉडने रमेश यांना मारहाण केली आणि त्यांच्या डाव्या त्याला फ्रॅक्चर झाले.

कारची काच फोडून रोकड लंपास

नवीन पनवेल : खारघर सेक्टर १३ येथील तिआरा कॉम्प्लेक्स परिसरात पार्क केलेल्या कारची काच फोडून अज्ञात चोरट्याने दोन लाख ८५ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमित पुगावकर (रा. नेरूळ सेक्टर ८) यांनी तिआरा कॉम्प्लेक्स येथे आपली एर्टिगा कार पार्क केली होती. यावेळी अज्ञात चोरट्याने कारची काच फोडून आतील दोन लाख ८५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

तीन हजार ७३ मिलीमीटर पावसाची नोंद

नवीन पनवेल : ऑक्टोबर महिन्याचे १८ दिवस उलटून गेले असून यावर्षी पनवेलमध्ये केवळ तीन हजार ७३ मिलीमीटर पावसाची नोंद झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे पनवेलकरांवर यावर्षी देखील पाणी कपातीचे संकट गडद होणार असल्याचे यावरून दिसत आहे. पनवेल परिसरात दरवर्षी साडेतीन ते चार हजार मिलिमीटर पावसाची नोंद होते. मात्र यावर्षी केवळ ३ हजार ७३ मिलिमीटर पाऊस कोसळल्याने चिंतेत भर पडली आहे. गेल्या दोन ते तीन आठवड्यांपासून पनवेल परिसरात पावसाचा पत्ता नाही. परतीचा पाऊस कोसळेल अशी आशा नागरिकांना होती. मात्र, ही आशा सपशेल फोल ठरली. परतीचा पावसाने पनवेलमध्ये पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. सद्यस्थितीत पाऊस गेला असल्याचे भाकीत वर्तवण्यात आले आहे. त्यामुळे या कमी पावसाचा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पनवेल परिसरात भात पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. शक्यतो चार महिने पाऊस पडतो. मात्र यावर्षी पावसाला उशीर झाला. जून महिन्याच्या शेवटी पाऊस बरसायला सुरुवात झाली होती आणि सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून मोठा पाऊस कोसळलेला नाही. पाऊस कमी झाल्याने यावर्षी पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवणार असल्याचे दिसत आहे. पनवेलमध्ये यापूर्वीच पाण्याची टंचाई जाणवत होती. मात्र, यावर्षी पाऊस कमी झाल्याने ही टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवणार आहे. सध्या ऑक्टोबर महिना सुरू असून भातरोपे वाढण्यासाठी पावसाच्या पाण्याची आवश्यकता आहे. जर पाऊस कोसळला नाही तर ही भातशेती खराब होऊ शकते. भाताचे दाणे मोठे होण्यासाठी पावसाच्या पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शेतकरी देखील चिंतेत आहे. शेवटच्या दिवसात पाऊस कोसळला असता तर नद्यांना देखील पूर आला असता मात्र तसे झालेले दिसत नाही. शेतांमध्ये देखील पाणी साचलेले नाही. त्यामुळे येत्या काही दिवसात पाऊस कोसळला नाही तर पनवेलकरांवर मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईचे संकट ओढवणार आहे.

मुरुडमध्ये आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा

एक्स-रे मशीन असून खासगी रुग्णालयांकडे धाव

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात आणि वेळेत आरोग्यसेवा मिळावी, यासाठी शासनाकडून ग्रामीण रुग्णालयांची व्यवस्था उभारण्यात आली आहे. मात्र, मुरुड ग्रामीण रुग्णालयातील परिस्थिती पाहता शासनाच्या या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र समोर आले आहे. रुग्णालयात एक्स-रे मशीन उपलब्ध असतानाही गेल्या वर्षभरापासून कायमस्वरूपी एक्स-रे तज्ज्ञ उपलब्ध नसल्याने रुग्णांना खासगी रुग्णालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

सरकारी रुग्णालयात उपचारासाठी येऊनही खासगी तपासणीसाठी खिशातून पैसे मोजावे लागत असतील, तर सर्वसामान्यांनी सरकारी आरोग्य व्यवस्थेवर विश्वास तरी कसा ठेवायचा, असा संतप्त सवाल



नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. बुधवारी (दि.१४) रोजी मुरुड ग्रामीण रुग्णालयात एकूण १३० रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी तब्बल २७ रुग्णांना एक्स-रे काढण्यासाठी खासगी रुग्णालयात जावे लागले.

खासगी रुग्णालयात एका एक्स-रेसाठी सुमारे ८०० ते १,००० रुपये खर्च करावे लागत असल्याने या २७ रुग्णांवर मिळून अंदाजे २१ हजार ६०० ते २७ हजार रुपयांपर्यंतचा आर्थिक भार पडू शकतो. सरकारी रुग्णालयातच ही सुविधा उपलब्ध असती, तर या रुग्णांना खासगी खर्चाचा फटका बसला नसता. त्यामुळे हा केवळ एका तपासणीचा प्रश्न नसून, सरकारी आरोग्यसेवेतील नियोजनाच्या अभावाचा गंभीर मुद्दा बनला आहे.

मशीन असूनही तपासणीसाठी रुग्णांना खासगी रुग्णालयात पाठवावे लागत असेल, तर या यंत्रणेचा उपयोग नेमका कोणासाठी, असा प्रश्न उपस्थित होतो. शासनाने आरोग्य सुविधांसाठी यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली, पण ती चालवण्यासाठी आवश्यक मनुष्यबळच उपलब्ध नसेल, तर अशा सुविधांचा सर्वसामान्यांना काय उपयोग? केवळ मशीन उपलब्ध असल्याची नोंद दाखवून आरोग्यसेवेची जबाबदारी पूर्ण होत नाही. त्या मशीनचा प्रत्यक्ष वापर होतो का, रुग्णांना वेळेत तपासणी मिळते का आणि त्यासाठी त्यांना बाहेर पैसे खर्च करावे लागतात का, याची जबाबदारी निश्चित करणेही तितकेच आवश्यक आहे.

तज्ज्ञांच्या अनुपस्थितीचा रुग्णांना फटका

ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरूपी एक्स-रे तज्ज्ञ नसल्याने प्रशासनाकडून रोहा येथील डॉ. सुवर्णा लोकरे यांची प्रभारी तज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, गेल्या तीन महिन्यांपासून त्या विविध वैयक्तिक कारणांमुळे वारंवार अनुपस्थित राहत असल्याचा आरोप होत आहे. त्यांच्या अनुपस्थितीत पर्यायी तज्ज्ञाची व्यवस्था केली जात नसल्याने एक्स-रे तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जबाबदारी निश्चित करा

रुग्णालयातील एक्स-रे सेवेचा प्रश्न हा केवळ एका पदाच्या रिक्ततेपुरता मर्यादित नाही. उपलब्ध यंत्रणेचा पूर्ण वापर होत आहे का, प्रभारी तज्ज्ञांच्या अनुपस्थितीत पर्यायी व्यवस्था का केली जात नाही आणि रुग्णांना खासगी रुग्णालयात जाण्याची वेळ का येते, या प्रश्नांची उत्तरे आरोग्य विभागाने देणे आवश्यक आहे. सरकारी आरोग्य सुविधांचा नेमका लाभ कोणाला मिळतो? हा प्रश्न आता मुरुडमधील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

खासगी प्राथमिक शाळा वेतनेत्तर अनुदानाच्या प्रतीक्षेत

। खरोशी । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा खासगी प्राथमिक शाळा कर्मचारी संघटनेच्या वतीने शिक्षण उपसंचालक मुंबई शिक्षणाधिकारी राजिप अलिबाग आणि वेतन व भनिनि पथक रायगड प्राथमिक यांना निवेदन देऊन व तोंडी विचारणा केली असता वेगवेगळी उत्तरे मिळत असल्याने आता पुन्हा एकदा निवेदन देण्यात आले. यावेळी प्रभारी शिक्षणाधिकारी भोपळे यांच्याशी सविस्तर सकारात्मक चर्चा झाल्याचे यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष साईनाथ गावंड सरचिटणीस यशवंत मोकल, उपाध्यक्ष सुधाकर जैवळ यांनी सांगितले आहे.



याप्रसंगी जिल्हा शिक्षणाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनामध्ये वेतनेतर अनुदान मागील दोन वर्षांपासून मिळत नसल्याने मुख्याध्यापक व शाळा प्रमुखांना संस्था धारेवर धरत आहे. तसेच शाळा चालवणे कसे कठीण झाले आहे हे शिक्षणाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले. रायगड जिल्ह्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना २०२४/२५ पासून वेतनेतर अनुदान मिळाले नाही, संच मान्यता त्रुटींमुळे अनेक शाळांचे पगार रखडत आहेत. त्यात कोणत्याही शाळेची चुक नसताना कर्मचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सद्या दोन महिन्यांची मुदत दिली असल्याने त्वरित संच मान्यता दुरुस्ती करून नवीन संचमान्यतेत त्रुटी राहू नयेत म्हणून निवेदन देण्यात आले आहे. प्रभारी मुख्याध्यापकांना गेली अनेक वर्षे किमान एक वर्षाची मान्यता मिळत होती, पण या शैक्षणिक वर्षापासून फक्त सहा महिनेच मान्यता देण्यात आली आहे, त्यामुळे किमान एक वर्षाची मुदत मिळावी यासाठी निवेदन देऊन प्रभारी मुख्याध्यापकांसमोर असणाऱ्या विद्यार्थी अडचणी दाखवून देण्यात आल्या, खासगी प्राथमिक शाळांतील शिक्षकांना माध्यमिक प्रमाणे वरिष्ठ/निवड श्रेणी मंजूर करावी, तसेच टप्पा /अंशतः अनुदानित कर्मचाऱ्यांना वरिष्ठ श्रेणी त्वरित मंजूर करावी अशी मागणी करण्यात आली.



अंजुमन महाविद्यालयाजवळ धोकादायक कठडा

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड शहरातील गणेश आळी ते सार्वजनिक वाचनालय रस्त्या दरम्यान अंजुमन महाविद्यालय रस्त्यालगत तीन दिवसांपूर्वी ट्रक खचल्याने मोरीचा तुटलेला कठडा धोकादायक ठरत असून नगरपरिषदेने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. गणेश आळी ते सार्वजनिकवाचनालय रस्त्यावर सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहनांची तसेच नागरिकांची वर्दळ असते. जवळच महाविद्यालय असल्याने मोरीचे तुटलेले कठडे धोकादायक ठरत आहेत. नगर परिषद प्रशासनाने शहरातील या रस्त्यावर मोरीचा खचलेला कठडा दुरुस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कर्जत बस आगाराचा अनागोंदी कारभार

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरानकरांनी अनेक संघर्षाची झळ सोसून कर्जत नेरळमार्गे माथेरान ही शासनाची मिनीबस सेवा जवळपास चार दशकानंतर ११ ऑक्टोबर २००८ मध्ये उपलब्ध करून घेतली आहे.तेव्हापासून स्थानिक लोक,जेष्ठ नागरिक त्याचप्रमाणे इथला व्यापारी वर्ग, शालेय विद्यार्थ्यींना मोठया प्रमाणावर या महत्त्वाकांक्षी सुविधेचा लाभ घेता येत आहे. या बसच्या माध्यमातून कर्जत आगाराला संपूर्ण तालुक्यात सर्वाधिक उत्पन्न प्राप्त होत आहे. असे असताना देखील या मार्गावर बसच्या फेऱ्या वाढविण्यासाठी आगाराकडून शासनस्तरावर प्रयत्न केले जात नाहीत, तसेच पर्यटन मंत्री सुध्दा लक्ष देत नाहीत. जुन्याच बसेस कशातरी पडत धडपडत सेवा देण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. स्थानिकांना या बसच्या स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाची हमी असताना कर्जत आगारामधून आता थेट पर्यटकांची वाहतूक केली जात असल्याने ज्येष्ठ नागरिकांना अनेक अडचणींना



सामोरे जावे लागत आहे. रविवारी (दि.१८) रोजी दुपारी बारा वाजता कर्जत आगारातून ही बस निघाली त्यामध्ये क्षमतेपेक्षा अधिक ७० पर्यटक प्रवासी कोंबून नेरळ येथे न जाता थेट दस्तुरी नाक्यावर पोहोचली. त्यावेळी नेरळ स्टॉपवर स्थानिक ज्येष्ठ नागरिक बसची वाट पहात उभे होते. अखेरीस नाईलाजाने त्यांनी खासगी वाहनाचा आधार घेऊन माथेरान गाठले. कर्जत आगाराच्या या अनागोंदी कारभारा बाबतीत तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

कर्नाळा स्पोर्ट्स क्लबजवळ स्टंटबाजी

। पनवेल । प्रतिनिधी ।

कर्नाळा स्पोर्ट्स क्लबजवळून दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दिशेने जाणाऱ्या बंद उन्नत मार्गावर दुचाकीस्वारांकडून स्टंटबाजी केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. सुरक्षेसाठी लावलेले सिमेंटचे बॅरिकेड्स सरकवून काही तरुण या मार्गावरून भरधाव दुचाकी चालवत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे या मार्गावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सकाळी आणि सायंकाळी व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांची वर्दळ असते. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलेही या मार्गावर चालण्यासाठी येतात.



अशा वेळी बंद मार्गावरून वेगाने जाणाऱ्या दुचाकीस्वारांमुळे पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होण्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत. बॅरिकेड्स लावून मार्ग बंद केलेला असतानाही ते सरकवून दुचाकी आत नेल्या जात असल्याने बंद मार्गावरील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या परिसरात काही तरुण-तरुणींकडून आक्षेपार्ह वर्तन होत असल्याच्या तक्रारीही नागरिकांनी केल्या आहेत. त्यामुळे कुटुंबासह व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांना अस्वस्थतेचा सामना करावा लागत असल्याचे सांगण्यात येते. सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरण राहावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः सायंकाळी ६ ते ८ या वेळेत नियमित पोलिस गस्त घालून बॅरिकेड्स सरकवून प्रवेश करणाऱ्या दुचाकीस्वारांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

अपघातापूर्वीच लक्ष द्या

बंद उन्नत मार्गावरील बेकायदा दुचाकी प्रवेश आणि स्टंटबाजीला आळा घालण्यासाठी पनवेल शहर पोलिसांनी तसेच वाहतूक पोलिसांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

मोटारसायकलची चोरी

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

हॉटेलमधील मॅनेजरने चेकद्वारे रोख रक्कम काढून हॉटेलमधील रक्कम चोरली तसेच मोटरसायकल चोरून नेल्याप्रकरणी लकी कुमार मिश्रा याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात १६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अतिथी एजंट्स हॉटेल कामोठे सेक्टर सहा येथे हॉटेल मॅनेजर म्हणून त्याच्यावर आर्थिक व्यवहार आणि व्यवस्थापनाची जबाबदारी दिली होती. मात्र आरोपीने बँकेच्या चेकमधून चार लाख रुपये रक्कम काढली तसेच हॉटेलच्या कॅश काऊंटरमधून मोबाईल आणि ७५ हजार रुपये रोख रक्कम तसेच बजाज कंपनीचे डिस्कवर मोटरसायकल घेऊन अपहार केला.

मूर्तीची विटंबनाप्रकरणी गुन्हा दाखल

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

पारगाव येथील मंदिरातील मूर्तीची विटंबना करून गदा मंदिराच्या समोरील तलावात फेकून दिल्या प्रकरणी मोहम्मद रहीसूलानिषा जैद (रा.पारगाव) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. जैद याने १६ ऑक्टोबर रोजी हिंदू धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने पारगाव मंदिरातील मूर्तीवर रांगोळी फेकून विटंबना केली तसेच गदा मंदिराच्या समोरील तलावात फेकून दिली. तसेच मंदिरातील पूजेचे साहित्याचे नुकसान केल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी आरोपी मोहम्मद जैद याला अटक केली.

हातभट्टीची दारू, रसायन जप्त | चार जणांवर गुन्हे दाखल

श्रीवर्धन पोलिसांची दमदार कामगिरी

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या व विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे ५५ हजार ५०० रुपये किमतीची गावठी हातभट्टीची तयार दारू, बिअरच्या बाटल्या आणि दारू बनवण्यासाठी लागणारे रसायन जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी ४ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शनिवारी (दि.१७) आक्टोंबर रोजी सकाळी ६.०० वाजताच्या सुमारास श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मगालसुरे काठीफ आणि निगडी काठी परिसरात गावठी हातभट्टीची तयार दारू विक्री केली जात असून दारू तयार



करण्याचे रसायन बाळगण्यात आल्याची बातमी गोपनीय बातमीदाराकडून मिळाली. या बातमीच्या आधारे श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या आदेशानुसार दोन पथके तयार करण्यात आली.

एका पथकाने गालसुरे काठी व दुसऱ्या पथकाने निगडी काठी येथे धाड टाकून आरोपींच्या ताब्यातील गावठी दारू आणि रसायन जप्त केले. तसेच खाडीकिनारी ठिकठिकाणी बेवारस आढळलेले हातभट्टीचे रसायन पोलिसांनी जागीच नष्ट केले आहे.

कारवाई रायगडच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजू सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप राठोड व त्यांच्या पथकाने केली.

पोलीस प्रशासनाचे जनतेला आवाहन

गावठी हातभट्टीची दारू तयार करणे, तिची साठवणूक करणे आणि विक्री करणे हे आरोग्यास अत्यंत घातक आहे. अशा दारूमध्ये विषारी रसायने किंवा प्राणघातक घटक असण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारच्या दारूचे सेवन करू नये आणि कुठेही अशी अवैध विक्री किंवा रसायन आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड पोलिसांकडून करण्यात आले आहे.

हजारो रुपयांचा मुद्देमाल जप्त

कारवाईत पोलिसांनी १०,१५० रुपये किमतीच्या बिअरच्या ५८ बाटल्या, तसेच ९०० लिटरहून अधिक हातभट्टीचे रसायन आणि तयार गावठी दारू असा एकूण ५५,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

बस आगार की खासगी 'पार्किंग तळ'?

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे ब्रीदवाक्य 'प्रवाशांच्या सेवेसाठी' असे असले, तरी रायगड विभागातील श्रीवर्धन आगारात मात्र सध्या खासगी वाहतूकदार आणि अनधिकृत जाहिरातदारांच्या फायद्यासाठी असा उलटा कारभार सुरू असल्याचे बोलले जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून कायमस्वरूपी आगार प्रमुख नसल्याचा गैरफायदा घेऊन, विभागीय पातळीवरील एका वादग्रस्त अधिकाऱ्याच्या मनमानी धोरणामुळे श्रीवर्धन डेपो पूर्णपणे बेवारस बनला आहे.

रायगड विभागीय कार्यालयात गेल्या ८ वर्षांपासून एकच अधिकारी एकाच संवेदनशील पदावर ठाण मांडून बसले आहेत. मध्यंतरी श्रीवर्धन आगाराचा बेवारस कारभार सुधारण्यासाठी एका महिला अधिकाऱ्याची नियुक्ती आगार प्रमुख म्हणून



करण्यात आली होती. एसटी महामंडळाच्या नियमांनुसार आगार परिसराच्या २०० मीटर अंतराच्या बाहेरच खासगी अथवा टी-परमिट व्यावसायिक वाहनांना उभे राहण्यास कायदेशीर परवानगी आहे. आगारात २०० मीटर परिसरात खासगी वाहने उभी करू नये-नो पार्किंग असे स्पष्ट चेतावणी देणारे फलक लावण्यात आले आहेत.

परंतु, या फलकांना धाब्यावर बसवत रोज अनेक खासगी कार, रिक्षा, टेम्पो आणि टी-परमिट वाहने थेट आगाराच्या मुख्य आवारात उभी केली जात आहेत.

> "डेपोच्या आवारातील अवैध खासगी वाहने आणि विनापरवानगी जाहिराती तातडीने हटवून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी. मुंबई मध्यवर्ती कार्यालयाने यात तात्काळ हस्तक्षेप करून पूर्णवेळ सक्षम आगार प्रमुखाची नियुक्ती करावी, अन्यथा शिवसेना-युवासेनेतर्फे तीव्र आंदोलन छेडले जाईल
> – शिवराज चाफेकर
> युवासेना तालुकाप्रमुख, श्रीवर्धन

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | सोमवार | दि. १९ ऑक्टोबर २०२६ | अंक १३३ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

अवैध बंदूक बाळगल्याप्रकरणी गुन्हा

पोलादपूर : एसटी स्थानकासमोरील आकृती हॉटेल समोरील रस्त्यावर एका पीकअपजीपमधील तीन व्यक्ती संशयास्पद वावरताना एका महिला कार्यकर्तीच्या निदर्शनास आले. ही बाब तीने त्यावेळी रात्रगस्तीवर असणाऱ्या पोलीसांना सांगितली. त्यानंतर त्या पोलिसांनी तातडीने त्या पीकअपमधील तीन व्यक्तींना हटकले. त्यावेळी पीकअपमध्ये सिंगल बोअर काडतूस आणि लाकडी बट असलेली ३० हजार रुपये किंमतीची बंदूक आणि 'शक्तिमान एक्सप्रेस' असे इंग्रजी अक्षरात लिहिलेली हिरव्या रंगाची १५०० रूपये किंमतीची १० जीवंत छरा •➤पान ५ वर

कोलकातामध्ये १९ जणांचा दुर्दैवी अंत

कोलकाता : चोरबागान येथील दुर्गा पूजा मंडपात झालेल्या चेंगराचेंगरमध्ये १९ जणांचा मृत्यू झाला असून, २५ हून अधिक लोक जखमी झाले आहेत. पोलिसांनी आयोजक आणि इतर लोकांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुर्गा पूजा मंडपामध्ये शनिवारी (दि.१७) रात्री गोंधळ उडाल्यामुळे १९ लोकांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत २५ जण जखमी झाले असून, त्यातील अनेक रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. याचे कारण अचानक झालेला पाऊस, गर्दीचे योग्य नियोजन न करू शकणे आणि चुकीची घोषणा हे असू शकते.

वेधक

गोकुळसाठी ९९.९६ टक्के विक्रमी मतदान

कोल्हापूर : जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. (गोकुळ) संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी रविवारी (दि.१८) अत्यंत चुरशीच्या वातावरणात तब्बल ९९.९६ टक्के विक्रमी मतदान पार पडले. या निवडणुकीत काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांनी एकाकी झुंज लढवली. तर, त्यांच्याविरोधात महायुतीकडून हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक, शौमिका महाडिक, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार प्रकाश आबिटकर, आमदार चंद्रदीप नरके, आमदार विनय कोरे या दिग्गज नेत्यांनी मोठी मोर्चेबांधणी करत तगडे आव्हान उभे केले होते. सोमवारी (दि.१९) सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला प्रारंभ होणार असून, दुपारी १ वाजेपर्यंत गोकुळवर कोणाची सत्ता येणार आणि निकालाची दिशा काय असेल, हे स्पष्ट होणार आहे.

ज्ञानेश कुमारांचा लंडनमध्येही विरोध

नवी दिल्ली : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून भारतात आंदोलन सुरू आहे. याचे पडसाद आता आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटताना दिसत आहेत. ब्रिटनची राजधानी लंडनमध्येही शुक्रवारी (दि.१६) भारतीय उच्चायुक्तालयाबाहेर 'स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया'च्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचे आंदोलन झाले. यूट्यूबर ध्रुव राठीही एकेठिकाणच्या आंदोलनात सहभागी झाला होता. यापूर्वी याच आठवड्यात लंडनमध्ये कॉंकरोच जनता पार्टीच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची हकालपट्टी करण्यासह एसआयआर प्रक्रिया रद्द करण्याच्या मागणीसाठी आंदोलन छेडण्यात आले होते.

अभिनेता टायगर श्रॉफवर गोळीबार

मुंबई : जुहू परिसरातील पुष्पा पार्क येथे अभिनेता टायगर श्रॉफ आणि त्याच्या चालकावर हल्लेखोरांनी गोळीबार केल्याची अत्यंत खळबळजनक घटना समोर आली आहे. या अचानक झालेल्या हल्ल्यात अभिनेता टायगर श्रॉफ, त्याचा चालक आणि एक रिक्षाचालक जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तीन व्यक्ती दुचाकीवरून आले आणि त्यांनी अचानक टायगर श्रॉफवर गोळीबार केला. या हल्ल्याचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. या आधी फेब्रुवारी महिन्यात मुंबईतील जुहू भागात प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या निवासस्थानाबाहेर गोळीबार करण्यात आल्याची घटना घडली होती.

खड्ड्याने घेतला आशा सेविकेचा जीव

■ रखडलेल्या रस्त्याने घेतला बळी

■ स्कुटरवरून जात असताना तोल जाऊन अपघात

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्याची दुरुस्ती मोठ्या प्रमाणात सुरू असून, येथील खड्ड्यांनी देखील जीवघेणे स्वरूप धारण केले आहे. अशातच शनिवारी (दि.१७) दुपारी वाकण येथील आशा सेविका स्कूटरवरून घराकडे जात असताना येथील खड्ड्यामध्ये त्यांचा तोल जाऊन त्या गंभीर जखमी झाल्या. त्यानंतर त्यांना उपचारासाठी पनवेल येथे पाठविण्यात आले. मात्र, रुग्णवाहिकेतच त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत पोलादपूर ते महाबळेश्वर, वाई आणि सुरूर या रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. तत्पूर्वी २०२१ च्या अतिवृष्टी काळामध्ये या रस्त्याच्या मार्गावर अनेक ठिकाणी दरडी कोसळल्यामुळे, तसेच रस्ता दरीमध्ये वाहून गेल्यामुळे या रस्त्याचे काम दोन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आले होते. मात्र, पोलादपूर शहरापासून काही अंतरावर रानबाजिरे फाट्यापर्यंत हे काम थांबले असून, या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे आणि अपूर्ण मोऱ्यांच्या कामांमुळे वाहतूक धोकादायक झाली आहे.

दरम्यान, शनिवारी दुपारच्या सुमारास वाकण येथील आशा सेविका वनिता साने (५१) या स्कुटरवरून पोलापूर-महाबळेश्वर या रस्त्यावरून घराकडे जात होत्या. त्या रानबाजिरे गावानजीक आल्या असता, येथील खड्ड्यात त्यांची स्कुटर आदळली. त्यात त्यांचा तोल जाऊन त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांच्यावर तात्काळ पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. मात्र, त्यांची परिस्थिती अधिकच गंभीर असल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी पनवेलला हलविण्यात आले. मात्र, वनिता साने यांना रुग्णवाहिकेतून नेत असताना माणगाव दरम्यान त्यांची प्रकृती अत्यंत खालावली. त्यानंतर रुग्णवाहिकेतील डॉक्टराने त्यांची तपासणी केली असता, त्यांनी मृत घोषीत केले.

पोलादपूरमधील स्थानिकांमध्ये रोष



पोलादपूर-महाबळेश्वर या रस्त्याची दुरूस्ती गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. त्यातच पोलादपूर शहरापासून रानबाजिरे फाट्यापर्यंत रस्त्याचे काम रखडले आहे. त्यामुळे या ठिकाणी जीवघेणे खड्डे पडले असून, धोकादायक प्रवास झाला आहे. त्यातच येथील रखडलेला रस्ता आणि खड्ड्यांमुळे आशा सेविकेचा बळी गेला. या घटनेमुळे पोलादपूरमध्ये एकच खळबळ उडाली आहे. स्थानिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित प्रशासन अजुन किती बळी गेल्यावर अपूर्ण रस्त्याची कामे पुर्ण करणार, असा सवाल स्थानिकांमधून विचारला जात आहे.

पंतप्रधानांच्या सोहळ्याला पर्यावरणप्रेमींचा निषेध

■ टोरेंट प्रकल्पाविरोधात बचाव समितीचा एलगार

■ दिवाळीनंतर महामोर्चा काढण्याचा निर्णय

। कर्जत/नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील हजारो एकर जमीन, वनसंपत्ती आणि आदिवासींच्या अस्तित्वावर विविध धरणे व जलविद्युत प्रकल्पांमुळे संकट निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पर्यावरणप्रेमींनी सरकारच्या धोरणांविरोधात एल्गार पुकारला आहे. टोरेंट प्रकल्पाच्या संभाव्य उद्घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी दि.३ नोव्हेंबर रोजी कर्जतमध्ये आल्यास निषेध नोंदवण्याचा इशारा कर्जत तालुका पर्यावरण बचाव समितीने दिला आहे. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संभाव्य कर्जत दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रकल्पविरोधातील भूमिका ई-मेलद्वारे पीएमओ कार्यालयाला मेल पाठवला जाणार असून, दिवाळी नंतर तालुक्यातील धरणांच्या विरोधात मोर्चा काढला जाणार असल्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ३ नोव्हेंबर रोजी बारामती दौऱ्यानंतर कर्जत तालुक्यातील कोठिंबे परिसरात खासगी दौऱ्यासाठी येणार असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील ब्रिटिशकालीन आणि अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या रस्त्यांच्या विकासाची कामे शासनस्तरावरून सुरू असल्याचे सांगितले जात आहे. मोदींच्या संभाव्य दौऱ्यामुळे रस्त्यांची दुरुस्ती आणि सुशोभीकरण होत असल्याची विडंबनात्मक टीका परिसरात केली जात आहे. खासगी कंपनीच्या दौऱ्यासाठी सरकारी यंत्रणा सक्रिय झाली आहे का, असा सवालही उपस्थित होत आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर साई डोंगर परिसरापर्यंत पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आल्याचे चित्र आहे.



पोलिसांचा बंदोबस्त वाढवला

पंतप्रधान नरेंद्र मोदी दि.३ नोव्हेंबर रोजी बारामती दौऱ्यानंतर कर्जत तालुक्यातील कोठिंबे परिसरात खासगी दौऱ्यासाठी येणार असल्याची चर्चा आहे. त्यांच्या संभाव्य खासगी कंपनीच्या दौऱ्यासाठी सरकारी यंत्रणा सक्रिय झाली आहे का, असा सवालही उपस्थित होत आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सायडोंगर परिसरापर्यंत पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आल्याचे चित्र आहे.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून टोरेंट प्रकल्पाला पाठिंबा देऊ नये आणि या प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी कर्जतमध्ये येऊ नये, अशी विनंती करण्यात येणार आहे. या प्रकल्पांमुळे पर्यावरण, वनसंपत्ती, जलस्रोत आणि आदिवासींच्या अस्तित्वावर परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे विकासाच् तसेच टोरेंटच्या पेज नदीवरील धरणामुळे कर्जत शहर व नेरळसह अनेक गावांच्या पाणी योजना अडचणीत येऊन कर्जत तालुक्याला प्रचंड पाणी टंचाईला सामोरे जावे लागेल. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा ऱ्हास होऊ नये, ही आमची भूमिका आहे. पंतप्रधानांचा कर्जत दौरा झाल्यास त्याचा निषेध करण्यात येईल.
>
> **-ॲड. कैलास मोरे, पर्यावरण बचाव समिती, कर्जत**

चित्र आहे.

या दरम्यान, कर्जत पर्यावरण बचाव समितीकडून कर्जत शहरातील शनी मंदिर येथे रविवारी (दि.१८) बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला संभाव्य पोशीर, शिलार, टोरेंट, टाटा, कोंढाणे आणि पाली-भूतिवली प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी सुमारे ११ हजार एकर क्षेत्र बाधित होण्याची भीती व्यक्त करत जंगलतोड, वन्यजीवांच्या अधिवासाचा नाश आणि आदिवासींच्या विस्थापनाचा प्रश्न मांडण्यात आले. पेज नदीवरील प्रस्तावित टोरेंट धरणामुळे कर्जत, नेरळ, माथेरान आणि ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली. या प्रकल्पांविरोधात जनजागृती करण्यासह दिवाळीनंतर प्रांत कार्यालयावर सर्व प्रकल्पग्रस्तांचा महामोर्चा काढण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. विकासाच्या नावाखाली निसर्ग, जलस्रोत आणि स्थानिक नागरिकांचे भविष्य धोक्यात घालू नये, अशी मागणी समितीने केली आहे.

तसेच, टाटा प्रकल्पातील खोदकाम आणि ब्लास्टिंगमुळे कातकरी वस्त्यांना धोका निर्माण होत असल्याचा आरोप तानाजी तुरडे यांनी केला. नॅन्सी गायकवाड यांनीही •➤पान ५ वर

खेळाडूंच्या धावपट्टीवर चारचाकी सुसाट

क्रीडा संकुलाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

। रायगड । प्रतिनिधी ।

अलिबाग जवळील नेहूली येथील क्रीडा संकुलाची दुरवस्था आधीच चर्चेचा विषय ठरत असताना, आता या संकुलातील धावपट्टीवर एका व्यक्तीने चारचाकी वाहन वेगाने फिरवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. खेळाडूंना सरावासाठी आवश्यक असलेल्या सुविधांची वानवा असतानाच धावपट्टीवर अशा प्रकारे वाहन चालवले जात असल्याने क्रीडा संकुलाच्या देखभालीचा आणि सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

नेहूली क्रीडा संकुलातील धावपट्टीवर मोठ्या प्रमाणात गवत वाढलेले असून, संकुलाच्या दुरवस्थेमुळे खेळाडूंना सराव करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत एका व्यक्तीने आपली चारचाकी गाडी थेट धावपट्टीवर आणून वेगाने फिरवल्याचा प्रकार घडला. या घटनेचा व्हिडिओ सर्वत्र प्रसिद्ध झाला आहे. धावपट्टी ही धावपट्टू आणि इतर खेळाडूंच्या सरावासाठी असते. अशा ठिकाणी चारचाकी वाहन वेगाने फिरवणे धावपट्टीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर बाब ठरू शकते. वाहनामुळे धावपट्टीचे नुकसान होण्याची शक्यता असून, त्याचवेळी खेळाडू सराव करत असतील तर त्यांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे क्रीडा संकुलात वाहनांना प्रवेश •➤पान ५ वर



शिक्षकाविरोधात विनयभंगाचा गुन्हा

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल येथील अंजुमन इस्लाम काळसेकर महाविद्यालयातील १९ वर्षीय विद्यार्थिनीची छेड काढल्याची घटना समोर आली आहे. पीडितेच्या आरोपावरून एका शिक्षकाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना महाविद्यालयाच्या कॅन्टीनमध्ये घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी विद्यार्थिनीने आपल्या कुटुंबीयांना माहिती दिली. त्यानंतर तिच्या कुटुंबियांकडून कामोठे पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार मुंब्रा येथील रियाज रशीद पठाण या शिक्षकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून, कामोठे पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

रेवदंडा पोलिसांची धडक कारवाई

४०० लिटर गावठी दारू जप्त



। रेवदंडा । प्रतिनिधी ।

अवैध गावठी हातभट्टीच्या दारूची वाहतूक करणाऱ्यांविरोधात रेवदंडा पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल ४०० लिटर गावठी दारू जप्त केली आहे. या कारवाईत दारूच्या साठ्यासह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार असा एकूण ३ लाख ४२ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. ही कारवाई शनिवारी (दि.१७) दुपारच्या •➤पान ५ वर

मोदींच्या स्वागतासाठी रस्त्याची डागडूजी



नेरळ : कर्जत तालुक्यात शेतकऱ्यांचा विरोध डावलून टोरंट कंपनीकडून हायड्रॉलिक प्रकल्प उभारण्याच्या हालचाली सुरू आहेत. या प्रस्तावित प्रकल्पाच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी देशाचे पंतप्रधान कर्जत येथे येणार असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, प्रशासनाने देशाच्या पंतप्रधान यांच्या मार्गावरील रस्ते नव्याने केले जाऊ लागले आहेत. तसेच, हेलिपॅडची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतली आहेत. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी सरकारकडे पैसे नसताना मोदींच्या स्वागतासाठी पैशांची उधळपट्टी कितपत योग्य आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

पाली तर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत मधील सायडोंगर येथे टोरंट कंपनीकडून हायड्रॉलिक प्रकल्प उभारला जात आहे. या प्रस्तावित प्रकल्पाच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार असल्याची •➤पान ५ वर



प्रथम क्रमांक

१) सौ. रश्मी अपुर्व पाटील, पेझारी
२) श्री. गजानन त्रिंबक म्हात्रे, थळ
३) श्री. योगेश प्रकाश वार्डे, रांजणपाडा-आवास
४) श्री. अनिल नारायण वर्तक, वरसोली
५) श्री. विनोद मेहेता, माणगाव
६) श्री. अजिंक्य शेळके, डोंगरी-मुरुड
७) श्री. पांडूरंग विष्णू घरत, लोणारे-थळ
८) श्री. पांडूरंग आरेकर, मुरुड
९) श्री. प्रथमेश दत्ताराम पाटील, दिवीपारंगी-अलिबाग
१०) श्री. चेतन संजय घरत, वरसोली-अलिबाग

द्वितीय क्रमांक

१) सौ. मितल राजेंद्र नाईक, रेवदंडा
२) श्री. संतोष खडतर, चेरवली-माणगाव
३) श्री. रोशन शिवराम म्हसकर, नार्पोली-पनवेल
४) श्री. प्रकाशदादा ठाकूर, झिराड
५) श्री. राजाराम दामोदर पाटील, डावळे-नागाव
६) श्री. मनोज सदाशिव भवारे, दहिवली-नेरळ
७) सौ. छाया विलास भिडे, पेण
८) मोंढे कुटूंब, मुनवली-अलिबाग
९) श्री. अनंत विष्णू पाटील, रामनाथ-अलिबाग
१०) श्री. समीर सावंत, तळवडे(गोठेघर) अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २२ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दु. १२ ते सायं. ४ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

बियाणांच्या वैभवाचं जतन अन् संवर्धन | **पुर्वजांचा गावरान वसा पुढे चालु ठेवला**

बीज संवर्धन दुर्गा : राहीबाई पोपेरे

मिलिंद मधुकर जाधव
श्रीवर्धन

तंत्रज्ञानाने जग कितीही प्रगत झालं,भौतिक सुखाच्या मागे धावून कितीही संपत्ती गोळा केली, ऐश्वर्याचे कितीही इमले बांधले तरी टिचभर पोटासाठी अन्नाचीच गरज असते हे वास्तव आहे. अन्न दर्जेदार असेल तरच आपलं आरोग्य निरोगी आणि सुदृढ रहातं. या निरोगी आरोग्याचं रहस्य आपल्या पूर्वजांनी, जिवापाड जपलेल्या परंपरागत गावरान बियाणांमधे दडलं आहे. पण कमी वेळेत, कमी खर्चात, कमी जागेत जास्त उत्पादन घेण्याच्या हव्यासापोटी आपण हरितक्रांतीच्या गोंडस नावाखाली संकरित बियाणांच्या वापराला चालना दिली. त्यामुळे उत्पादन वाढलं तरी त्याच्या दर्जावर मात्र प्रश्नचिन्ह लागलं. यासोबतच रासायनिक खतांच्या वापराने जमिनीची हरवलेली सुपीकता या सर्वांच्या एकत्रित परिणामाने आपल्या ताटात निकृष्ट दर्जाचं अन्न येऊ लागलं. याच अन्नाने आपलं आरोग्य दिवसेंदिवस खालावत चाललं आहे.



या परिस्थितीचं भान आणि पुरेपूर जाण असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यातील, कोंभाळणे गावच्या राहीबाई सोमा पोपेरे यांनी आपल्या पूर्वजांचा गावरान बियाणांचा वसा पुढे कायम चालू ठेवला. जन्म आदिवासी कुटुंबात झाला. आठ भावंड, वडिलांची चार-पाच एकर शेती. गरिबीमुळे लहानपणापासूनच गुरं राखणं आणि शेतीत राबणं, या नेहमीच्या दिनक्रमाने नाळ मातीशी घट्ट जोडली गेली. शाळेचं तोंडही न बघितलेल्या राहीबाईंच्या कपाळावर भलेही अशिक्षितपणाचा शिक्का असेल, पण कृषी विद्यापीठांना लाजवेल अशा बावन्नकशी गावरान बियाणांच्या वैभवाचं जतन आणि संवर्धन करण्याचं मौलिक कार्य त्या प्रामाणिकपणे पार पाडत आहेत.

रोजच्या ताटातला मुख्य घटक असलेल्या नुसत्या भाताच्या त्यांच्याकडे सतरा गावरान जाती आहेत. आठ प्रकारच्या वालाच्या जातीसह वेगवेगळी धान्य, तेलबीया आणि पालेभाज्यांचे, हरितक्रांतीच्या गदारोळात हरवलेले वाण, त्यांच्या घरी सुखाने नांदत आहेत. कोंभाळणे आता त्यांचं फक्त गाव राहिलं नसून गावरान बियाणांची एक चळवळ बनलं आहे. मोठमोठ्या विद्यापीठात त्यांच्या व्याख्यानांचं आयोजन केलं जातं.

गावरान बियाणांचा वसा त्यांनी स्वतःच्या शेतीपुरती मर्यादित न •➤पान ५ वर

२०२६ चा मोठा विनोद

भारतीय जनता पक्ष इतके वर्षे आगखाऊ भाषणे करीत होता, काँग्रेसने किती अन्याय केला म्हणून संताप व्यक्त करीत होता, अच्छे दिन आयेंगे अशा थापा मारत होता. पण आता तो केविलवाणे विनोद करू लागला आहे. दिल्लीमध्ये आंदोलने करणाऱ्या काँग्रेसचा खरा हेतू या देशात सत्ताबदल करण्याचा आहे असा आरोप भाजपचे राजनाथ सिंगांसारखे मंत्री व प्रवक्ते करू लागले आहेत. इकडे आदेशानुसार देवाभाऊंनीही हाच आरोप मराठीत केला. वास्तविक यात आरोप करण्यासारखे काय आहे असा प्रश्न सामान्य माणसाला पडेल. आता ताकद कमी झाली असली तरी काँग्रेस हा देशातील सर्वात मोठा विरोधी पक्ष आहे. गेली बारा वर्षे तीन लोकसभा निवडणुका तो लढला. आधी आपली सत्ता वाचवण्यासाठी आणि २०१९ आणि २०२४ मध्ये मोदींना सत्तेवरून हटवण्यासाठीच ही लढाई होती. मोदींना सत्तेतून का घालवले पाहिजे हे तो २०२४ नंतरही सातत्याने सांगतो आहे. अदानीसोबतच्या मोदी सरकारच्या भानगडी, निवडणूक निधीच्या नावाखाली राबवलेली बेकायदा योजना, राममंदिराच्या तिजोरीवरचा दरोडा आणि अलिकडे केलेली मतांची चोरी अशी कारणे काँग्रेसने उघडपणे वारंवार दिली आहेत. सध्याचे आंदोलन ज्ञानेश कुमार यांना घालवण्यासाठी असले तरी त्यांचे बॉस मोदी व शहा आहेत व त्यांच्या आदेशानुसारच ज्ञानेश यांनी भानगडी केल्या आहेत असे राहुल यांचे म्हणणे आहे. म्हणून तर ज्ञानेश यांना ते माफीचा साक्षीदार होऊन पापांची कबुली द्या असे आवाहन करीत आहेत. आपल्याला ज्ञानेश कुमार यांच्याकडून व्हॉट्सॅप मेसेज आल्याचा दावाही राहुल यांनी केला असून त्यावर ज्ञानेश यांच्या वतीने काहीही प्रतिक्रिया आलेली नाही हे उल्लेखनीय आहे. या स्थितीत काँग्रेसला रेजिम चेंज किंवा सत्ताबदल करायचा आहे म्हणजे ते जणू काही देशद्रोह करीत आहेत असे भाजप जे भासवू पाहत आहे ते अत्यंत अनाकलनीय आणि तितकेच पोरकटपणाचे आहे.

उठावाची हाक दिलेली नाही

काँग्रेसने कोठेही सशस्त्र लढ्याची हाक दिलेली नाही. जयप्रकाश नारायण यांच्याप्रमाणे पोलिस किंवा सैनिकांना बेकायदेशीर आदेश पाळू नका असे आवाहन राहुल यांनी केलेले नाही. मोदींनी राजीनामा द्यावा अशी थेट मागणीही त्यांनी अजून केलेली नाही. ज्ञानेश कुमार यांनी निवडणूक आयोगात जो हैदोस घातला आहे त्याबद्दल त्यांना शिक्षा व्हावी आणि हे सर्व कोणाच्या फायद्यासाठी चालले होते त्याची चौकशी व्हावी असे त्यांचे म्हणणे आहे. रेजिम चेंजची भाषा ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी एका पत्रकार परिषदेत केली. अरब देशांमध्ये, नेपाळ, बांगलादेश किंवा श्रीलंकेमध्ये देशातील नागरिकांनी उठाव केला व तेथील सरकार उलथून टाकले. रेजीम चेंज या शब्दप्रयोगाला या उठावांचा संदर्भ आहे हे खरे आहे. पण तसे आवाहन येथील काँग्रेससह कोणत्याही पक्षाने केलेले नाही. कॉकरोच जनता पार्टीनेही ज्ञानेश यांचा राजीनामा हीच मागणी लावून धरली आहे. गंमत म्हणजे भाजपवाले काँग्रेसवर कडाडून टीका करीत असताना मोदी-शहांचे नाव घेऊन त्यांचे वाभाडे काढणाऱ्या अभिजित दीपके वा त्यांच्या कॉकरोच पार्टीविषयी चकार शब्दही बोलायला तयार नाहीत. कारण, कॉकरोच पार्टीला या देशातील तरुणाईचा पूर्ण पाठिंबा आहे हे भाजपला कळून चुकले आहे. त्यांच्या विरोधात काहीही बोलणे म्हणजे सत्ताबदलाला स्वतःहून मदत करण्यासारखे आहे इतकी अक्कल भाजपला नक्कीच आहे. खरी स्थिती अशी आहे की या तरुणाईच्या जबरदस्त पाठिंब्यामुळे भाजपवाले हादरून गेले आहेत. कारण त्यांचे कट्टर भक्तही या कॉकरोच पार्टीच्या युक्तिवादापुढे गार पडत आहेत. गेल्या ७५ वर्षात कोणी दिल्या व ऐकल्या नाहीत अशा शिव्या मोदी व शहांच्या नावाने खुलेआम घातल्या जात आहेत. एखाद्या औषधाची येते तशी सतत मोदी, मोदी असे करण्याची ही जबरदस्त रिएक्शन आलेली आहे. भक्तगणांमध्ये गोंधळ उडाला आहे. त्यामुळेच काँग्रेस व राहुल यांना खलनायक ठरवणे हा नेहमीचा फंडा वापरणे चालू आहे. त्यातून मग यांना बांगलादेश किंवा नेपाळप्रमाणे इथली सत्ता उलथून टाकायची आहे असा विनोदी आरोप केला जातो. या आंदोलनाला अमेरिकेतून पैसा येत आहे, इलॉन मस्क किंवा तत्सम लोक याच्या मागे आहेत असे सांगितले जात आहेत. पण भाजपच्या या कांगाव्यावर आता केवळ निर्बुध्द भक्तच विश्वास ठेवू शकतात. भाजपचा मुखवटा आणि चेहरा दोन्हीही फाटून त्याचा तमाम कपटीपणा आता उघड झाला आहे.

भाजपची गाळण उडाली आहे

आज रेजिम चेंज च्या नावाने बोंब मारणाऱ्या याच पक्षाच्या नेत्यांनी एकेकाळी रथयात्रा काढली, त्यातून दंगली झाल्या, मग कोर्टाला फसवून अयोध्येतील मशीद पाडली, पुन्हा दंगली झाल्या. हे सर्व काँग्रेसची सत्ता उलथून टाकण्यासाठीच होते. २०१२मध्ये अण्णा हजारे नावाच्या बाहुल्याला पुढे करून भ्रष्टाचाराविरुध्द बोंब ठोकण्यात आली. कोळसा, दूरसंचार इत्यादीबाबतचे सर्व आरोप बोगस असल्याचे नंतर सिध्द झाले. इतकेच काय ज्यांच्यावर असे आरोप केले त्या अजित पवार, अशोक चव्हाण, हेमंत सर्मा, सुवेंदू अधिकारी अशा लोकांना भाजपने आपल्यासोबत घेऊन पदेदेखील दिली. २१०२ सालचे आंदोलन हे सत्ता उलथून टाकण्याचे मोठे कारस्थान होते. नंतर मोदी सत्तेत आल्यावर महाराष्ट्रात दोन पक्ष फोडण्यात आले. निवडणूक आयोग, न्यायालय इत्यादींच्या मदतीने सत्ता उलथून टाकण्यात आली. ज्या राज्यपालाने बेकायदा काम केले त्याला पद्म पुरस्कार दिला. अशाच रीतीने मध्य प्रदेश, छत्तीसगड, बंगालमध्ये फोडाफोडी केली. निवडणूक आयोगाला हाताशी धरून मतदारयाद्यांमध्ये गोंधळ केले. बंगालमध्ये २७ लाख नावे काढून टाकली. महाराष्ट्रात आधी ४० लाख नावे वाढवली आणि आता दोन कोटी नावे काढली. अशा अंदाधुंद कारभाराविरुध्द आंदोलने केली तर ती दडपण्यासाठी दिल्लीत ४० हजार पोलिस तैनात केले. आणि वर पुन्हा आमची सत्ता पालटण्याचा हा कट आहे म्हणून हे उलटा कांगावा करीत आहेत. उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट सांगितले आहेच. की होय, आम्ही मोदींची सत्ता घालवण्यासाठीच लढत आहोत. तसेच बाकीच्यांनीही आता छाती ठोकून सांगायला हवे की होय सत्ता बदलण्यासाठीच ही सर्व लढाई आहे. वास्तव असे की, ज्ञानेश कुमार प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात चालू असलेल्या सुनावणीतून अनेक भीषण सत्ये बाहेर येण्याची शक्यता आहे. मुख्य म्हणजे बंगालमध्ये मतदारांना बेकायदा ठरवणे, त्यांच्या अपिलांवर सुनावणी न होताच निवडणुका घेणे हे सर्वच अभद्रपणाचे आहे. एखादे कडक न्यायाधीश असतील तर ते याबाबत टोकाची भूमिका घेऊन निवडणुका रद्द करण्याचा आदेश देऊ शकतात. तसे झाले तर ज्ञानेश कुमारांना हाताशी धरून मोदी व शहा यांनी हे सर्व कारस्थान घडवून आणले या आरोपाला बळकटी येईल. समजा असे काही झाले नाही व निदान फॉर्म सहा किंवा अन्य भानगडींबाबत ज्ञानेश यांच्यावर ताशेरे पडले तरी त्यांना राजीनामा द्यावा लागू शकेल व तीही मोदी शहांची नाचक्कीच असेल. या संभाव्य पराभवांच्या भीतीने भाजपची गाळण उडाली असून ते रेजीम चेंजसारखे विनोद करू लागले आहेत. किंवा खरे तर बरळू लागले आहेत.

विचार

आभाळाची अवकृपा, शासनाचा आधार

पावसाच्या दीर्घ खंडाने आणि अपुऱ्या पर्जन्यमानाने महाराष्ट्रातील खरीप हंगाम अक्षरशः करपून गेला. परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला. त्याद्वारे जमीन महसुलात सवलत, पीक कर्जाचे पुनर्गठन, कृषी कर्जाच्या वसुलीला स्थगिती, कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत आणि इतर अनेक उपाययोजनांची घोषणाही केली. मात्र, खरी कसोटी या सवलती शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत वेळेत पोहोचवण्यामध्ये आहे.



भागा वरखडे

महाराष्ट्राच्या मातीत यंदा केवळ पिके करपलेली नाहीत, तर शेतकऱ्यांच्या आशाही करपण्याची वेळ आली आहे. आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्याला पाऊस मिळाला नाही आणि जिथे मिळाला तिथे त्याचे वितरण इतके असमान राहिले, की एका बाजूला पिके तहानेने सुकली, तर दुसऱ्या बाजूला अल्पावधीत पडलेल्या पावसाने पिकांचे नुकसान केले. मॉन्सूनच्या लहरीपणाने पुन्हा एकदा भारतीय शेतीची पावसावर असलेली परावलंबित्वाची स्थिती उघड केली. त्यामुळे दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नाही, तो शेतकऱ्यांच्या आयुष्यातील आर्थिक संकटाची अधिकृत कबुली आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित झाला आहे. पर्जन्यमानातील तूट आणि दीर्घकाळ पावसाचा खंड यामुळे ३२ हून अधिक जिल्ह्यांमध्ये परिस्थिती गंभीर बनली आहे. सोलापूर, अहिल्यानगर, नाशिक, लातूर, बीड, बुलडाणा, अमरावती, यवतमाळ, नागपूर आणि चंद्रपूरसह अनेक जिल्ह्यांना या संकटाचा मोठा फटका बसला आहे. दुष्काळाच्या घोषणेनंतर काही महत्त्वाच्या सवलती लागू होणार आहेत. जमीन महसुलात सवलत मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन केले जाणार आहे. कृषी कर्जाच्या वसुलीला स्थगिती दिली जाणार आहे. कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात सवलत किंवा माफी, रोजगार हमी योजनेच्या निकषांमध्ये शिथिलता, पाणीटंचाईच्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा आणि नागरिकांसाठी अन्नधान्याची व्यवस्था अशा उपाययोजनांचाही समावेश आहे.

एव्हाना सरकारतर्फे पीक नुकसानीचे पंचनामे छायाचित्रे आणि जीपीएस नोंदींसह करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कागदावर पाहता या सवलतींची यादी मोठी आहे; परंतु शेतकऱ्याच्या दृष्टीने प्रश्न अंमलबजावणीचा आहे. दुष्काळ जाहीर झाल्याचा आदेश शेतकऱ्याच्या घरापर्यंत पोहोचला, तरी त्याच्या खात्यात मदत किती दिवसांमध्ये पोहोचणार, कर्जाची वसुली थांबली, तरी पुढील हंगामासाठी भांडवल कुठून मिळणार, वीजबिलात सवलत मिळाली, तरी विहिरीत पाणी नसेल तर त्या विजेचा उपयोग काय, रोजगार हमीची कामे वाढवली, तरी गावातच पुरेसे काम उपलब्ध झाले नाही, तर स्थलांतर कसे थांबणार या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. सर्वात आधी गरज आहे ती पीक नुकसानीच्या पंचनाम्यांची. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्याला कागदपत्रांच्या चक्रात अडकवून ठेवले, तर शासनाच्या मदतीचा उद्देशच फोल ठरेल. शेतात उभे राहून सुकलेले सोयाबीन, मका, कापूस, ज्वारी, भात किंवा इतर पिके पाहण्याची वेळ अधिकाऱ्यांवर आली आहे. नुकसान प्रत्यक्ष किती आहे, हे कागदावर नव्हे, तर बांधावर जाऊन ठरवावे लागेल. सरकारनेही पीक नुकसानीच्या आर्थिक मदतीसाठी स्वतंत्र निर्णय पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर घेतला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या प्रक्रियेला विलंब होणे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे ठरेल.

पीक कर्जाचे पुनर्गठन हा महत्त्वाचा दिलासा आहे; मात्र पुनर्गठन म्हणजे संकट पुढे ढकलणे एवढाच त्याचा अर्थ राहता कामा नये. ज्या शेतकऱ्याचे उत्पन्नच झालेले नाही, त्याच्याकडून जुन्या कर्जाची परतफेड कशी अपेक्षित करायची? त्यामुळे पुनर्गठित कर्जाला दीर्घ मुदत, कमी व्याजदर आणि पुढील हंगामासाठी नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्याची जोड आवश्यक आहे. अन्यथा, शेतकरी एका कर्जाची परतफेड करण्यासाठी दुसरे कर्ज घेण्याच्या दुष्टचक्रात अडकत राहील. वीजबिलातील सवलतही महत्त्वाची आहे; परंतु दुष्काळाच्या काळात कृषी पंपांना अखंडित वीज देणे त्याहून महत्त्वाचे आहे. विहिरी, बोअरवेल आणि उपलब्ध जलस्रोतांमधून शेतीला पाणी देण्यासाठी वीजपुरवठा खंडित झाला तर सवलतीचा अर्थ उरणार नाही. ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, तेथे टँकरची व्यवस्था कागदावर न राहता प्रत्यक्षात नियमित झाली पाहिजे. जनावरांसाठी चारा उपलब्ध करणे हीदेखील तातडीची गरज आहे. दुष्काळात माणसाच्या पाण्याबरोबरच पशुधनाच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न उभा राहतो. तो दुर्लक्षित केला तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारच कमकुवत होईल. रोजगार हमी योजनेच्या कामांना दुष्काळग्रस्त भागात अधिक व्यापक स्वरूप देणे गरजेचे आहे. शेतात उत्पन्न नाही, मजुरीची कामे कमी झाली आणि घरखर्चाचा भार वाढला, तर ग्रामीण कुटुंबांकडे शहरांकडे स्थलांतर करण्याशिवाय पर्याय उरणार नाही.

रोजगार हमी योजनेची कामे गावातच उपलब्ध झाली, तर किमान रोख उत्पन्नाचा आधार मिळेल. त्याचबरोबर ही कामे केवळ खड्डे खोदण्यापुरती मर्यादित न ठेवता जलसंधारण, नाला खोलीकरण, गाळ काढणे, बंधारे, शेततळी, पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरणाशी जोडली पाहिजेत. आजच्या रोजगारातून उद्याच्या पाण्याची निर्मिती झाली, तर दुष्काळ निवारणाला दीर्घकालीन अर्थ प्राप्त होईल. दुष्काळाचा सर्वाधिक गंभीर परिणाम खरीप संपल्यानंतर जाणवणार आहे. कारण शेतकऱ्याची खरी परीक्षा रब्बी हंगामात होणार आहे. जमिनीमध्ये पुरेसा ओलावा नसेल आणि धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा नसेल, तर गहू, हरभरा, ज्वारी, करडई, मोहरी यांसारख्या पिकांची पेरणी धोक्यात येईल. खरीप हातातून गेल्यानंतर रब्बीची संधीही गेली, तर शेतकऱ्याच्या संपूर्ण वर्षाचे आर्थिक गणित कोलमडेल. याचा परिणाम केवळ शेतकऱ्याच्या उत्पन्नावर होणार नाही. ग्रामीण बाजारपेठेत पैसा फिरला नाही, तर ट्रॅक्टर, दुचाकी, शेतीची अवजारे, कपडे, बांधकाम साहित्य, ग्राहकोपयोगी वस्तू यांची मागणी कमी होईल. शेतीतील संकट हळूहळू ग्रामीण अर्थव्यवस्थेत आणि त्यानंतर राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत पोहोचते. अन्नधान्याचे उत्पादन घटले, तर महागाई वाढण्याचा धोका निर्माण होतो. अन्नधान्य महागले, तर सामान्य कुटुंबाच्या बजेटवर थेट परिणाम होतो. म्हणून दुष्काळ हा केवळ शेती विभागाचा विषय नसून तो अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि सामाजिक स्थैर्याशी जोडलेला प्रश्न आहे, म्हणूनच दुष्काळाच्या तात्कालिक मदतीबरोबरच दीर्घकालीन धोरणाची गरज आहे. दर काही वर्षांनी पावसाने पाठ फिरवली, की मदतीची पॅकेज जाहीर करण्याची पद्धत कायमची उपाययोजना ठरू शकत नाही. हवामानबदलामुळे पावसाचे प्रमाणच नव्हे, तर त्याचे वितरणही अनिश्चित होत आहे. कधी प्रदीर्घ कोरडा काळ, तर कधी काही तासांमध्ये मुसळधार पाऊस या बदलत्या हवामानाशी शेतीला जुळवून घ्यावे लागेल. यासाठी पीकपद्धतीत बदल आवश्यक आहे. पाण्याची उपलब्धता कमी असणाऱ्या भागामध्ये अतिपाणी लागणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देण्याऐवजी ज्वारी, बाजरी, नाचणी, कडधान्ये आणि तेलबियांसारख्या तुलनेने कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना बाजारपेठ, हमीभाव आणि प्रक्रिया उद्योगाची जोड द्यावी लागेल. ठिबक आणि तुषार सिंचनाचा विस्तार करावा लागेल. पाण्याचा प्रत्येक थेंब उत्पादनक्षम करण्याची वेळ आली आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही घोषणा महाराष्ट्राने अनेक वर्षे ऐकली आहे. आता या घोषणेचे मोजता येणारे परिणाम दाखवण्याची वेळ आली आहे. किती गावांमध्ये पाणलोट विकास झाला, किती पाणी साठवले गेले, भूजलपातळी किती वाढली, किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला, याचे सामाजिक आणि तांत्रिक ऑडिट झाले पाहिजे. दुष्काळग्रस्त भागातील प्रत्येक रुपया पुढील दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी खर्च झाला पाहिजे. हवामान अंदाज आणि कृषी सल्ला गावाच्या पातळीपर्यंत पोहोचवणेही आवश्यक आहे. उपग्रह, रडार, मातीतील आर्द्रता मोजणारी यंत्रणा आणि स्थानिक हवामान केंद्रांच्या मदतीने शेतकऱ्यांना पेरणी, फवारणी, पाणी व्यवस्थापन आणि कापणीबाबत अचूक सूचना देता येऊ शकतात.

डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केवळ सरकारी कार्यालयातील आकडेवारीसाठी नव्हे, तर थेट शेतकऱ्याच्या निर्णयक्षमतेसाठी झाला पाहिजे. राज्य सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून संकटाची तीव्रता मान्य केली आहे. आता या निर्णयाचे मोजमाप घोषणांच्या संख्येने नव्हे, तर मदत मिळालेल्या शेतकऱ्यांच्या संख्येने झाले पाहिजे. महसुलात सवलत मिळाली का, कर्जवसुली थांबली का, पीककर्जाचे पुनर्गठन झाले का, वीजसवलत प्रत्यक्ष बिलात उतरली का, रोजगार हमीची कामे सुरू झाली का, टँकर वेळेवर पोहोचतो का, चारा उपलब्ध आहे का या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने द्यायला हवे.

चर्चा आजची

महिलांसाठी सुरक्षित दिवस कधी?



संतोष राऊळ

सध्या देशभरात नवरात्रोत्सव साजरा होत आहे. या नऊ दिवसांत कुलदेवी आणि देवतेची मनोभावे पुजा अर्चा केली जात आहे. तसेच, देशभरातील विविध देवी देवतांच्या मंदिरांसह घरोघरी आणि सार्वजनिक ठिकाणी प्रतिष्ठापना केलेल्या देवींच्या मुर्तींच्या ठिकाणी देखील या नऊ दिवसांत मोठा उत्सव साजरा केला जात आहे. सकाळी देवीची पुजा, दिवसभर विविध कार्यक्रम आणि गरबा खेळण्यात सर्वजण रमतात. त्यामुळे वर्षभर खास करून महिला वर्ग या नऊ दिवसांची वाट पाहतात. त्यांना या नऊ दिवसांत घराच्या बाहेरचं जग पाहता येतं, नऊ दिवसांच्या नऊ रंगांत रंगता येतं, काही प्रमणात मनासारखं जगता येतं आणि मनसोक्त गरबा देखील खेळता येतो. खरंतर हे नऊ दिवस महिलांसाठी विशेष दिवस म्हणून आरक्षित केले पाहिजेत, असेही काहींचे विचार असू शकतात. असं झालंच तर चांगलच आहे; परंतु, असं झालं नाही तरं काय? तसंही महिला आताही आहे तसा दिवस काढतच आहेत. महिलांसाठी हे नऊ दिवस जरी विशेष दिवस केले तरी काय फारसा फरक पडणार. निदान, विशेष नाही पण महिला आणि बालकांसाठी सुरक्षित दिवस म्हणून तर आरक्षित ठेऊ शकतो ना, असे महिला वर्गातून बोलले जात आहे.

नऊ रात्रीच्या नऊ दिवसांत महिला वर्ग मोठ्या प्रमणात देवीच्या दर्शनासाठी आणि त्यानिमित्त ठेवण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी बाहेर पडत असतो. त्या कार्यक्रमांत सहभागी होण्यासह भागही घेत असतात. या नऊ दिवसांत त्यांना नऊ रंगात रंगता येतं. आवडीचे कपडे, नवरात्रोत्सवानिमित्त जमलेल्या इतर महिलांशी ओळख होणे, त्यांच्याशी चर्चा करणे, तसेच रात्री त्यांच्याशी गरब्याचा आनंद लुटणे असा विविध आनंद त्या घेत असतात. आजकाल भजन आणि गरबा सोडून लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंतच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यात विविध खेळ, भजनांच्या बारी, वेशभूषा आणि इतर स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यात विशेष करून लहान मुलांसह महिला वर्ग मोठ्या प्रमाणात भाग घेत असतो. या सहभागामुळे त्यांना काही वेळेसाठी स्वातंत्र्य मिळतं. त्यामुळे या नऊ दिवसांची वर्षभर त्या वाट पाहत असतात. जरी एखादा महिला वर्ग कोणत्या कार्यक्रमात सहभाग घेत नसला तरी, देवीची मनोभावे सेवा करणे तसेच इतर काही सेवा त्यांच्याकडून केली जाते. त्यामुळे हे नऊ दिवस महिलांसाठी विशेष दिवस म्हणून आरक्षित व्हावेत, अशीही इच्छा महिला वर्गात असू शकते. त्यांची अशी इच्छा असणे यात काही वावगे नाही. असे झाल्यास त्यांना या नऊ दिवसांत अजुन मनमुराद जगता येऊ शकेल.

पण, असे झाले तर फक्त नऊ दिवसच का? संपूर्ण वर्षभर का नाही? असा सवालही महिला वर्गातून उपस्थित होऊ शकतो. निदान त्यांच्या स्वातंत्र्याचा आणि सुरक्षिततेवर भर देणे गरजेचे आहे. या नऊ दिवासांचे पहिले तर महिलांचा उत्साह शिगेला पोहोचलेला असतो. मात्र, त्यातील बहुतांश महिलांना हा उत्सव चार भिंतीतच बसुन करावा लागतो. कारण, त्यांना बाहेरच्या जगाची भीती वाटते. किंवा त्यांना भीती नसली तरी, स्वकीयांना असतेच. त्यांच्यामुळे त्या बाहेर पडु शकत नाहीत. किंवा त्यांच्या मनात भीती भरवली जाते. ती भीती त्यांच्या मनातून काढणं गरजेचं आहे.

नवरात्रोत्सवात असंख्य महिला दिवसभरात देवीच्या दर्शनासाठी जात असतात. तसेच, रात्रीच्या सुमारास दांडीया खेळण्यासाठी देखील मोठ्या प्रमाणात महिला जात असतात. मात्र, त्यांच्या प्रवासात आणि खासकरून रात्री त्या किती सुरक्षित असातत, हा मोठा प्रश्न आहे. कारण दर्शनसाठी महिला वर्ग लांबलांबचा प्रवास करत असतात. त्या खासगी किंवा सार्वजनिक वाहनांमधून प्रवास करत असतात. त्यावेळी अपघात, चोरी आणि गैरवर्तन अशा अनेक समस्या त्यांच्यासमोर उभ्या असतात. खासकरून रात्रीच्या वेळी. कारण सर्वत्र गरब्याचे आयोजन हे रात्रीच्या सुमारास असते. आणि त्यावेळी मोठ्य प्रमाणात महिला वर्ग गरबा खेळण्यासाठी बाहेर पडतो. यावेळी अनोळखी व्यक्तींसोबत ओळख होऊन त्याचा गैरफायदा घेण्याचे प्रकार देखील मोठ्या प्रमाणात घडत आहेत. मात्र, याकडे सरकारी यंत्रणेचे लक्ष जात नाही. उलट त्या महिलेवरच संशयाने पाहिले जाते. खरतंर वर्षभरच, निदान या नऊ दिवसांत तरी महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक ठिकाणी पोलीस बंदोबस्त असणे गरजेचे आहे. महत्त्वाचे म्हणजे पोलिसांना बघून मनात भीती उत्पन्न होण्यापेक्षा, पोलिसांची उपस्थिती त्यांना समाधानी आणि आपण सुरक्षित असल्याची भावना निर्माण करून देणारी हवी, अशी मते महिला वर्गातून उपस्थित होत आहेत.

लोकसंसद

रावण दहनाला विरोध निरर्थक!

साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त असलेल्या विजयादशमी सणाचे हिंदू धर्मात विशेष महत्व आहे, याच दिवशी प्रभू श्री रामचंद्रांनी लंकापती रावणाचा वध करून एक नवा पायंडा जगासमोर ठेवला. प्रकांड पंडित असलेला रावण मोठा शिवभक्त होता त्यामुळे त्याला मानणारा समाज आजही श्रीलंकेत दिसून येतो; मात्र रावण हा स्त्रीलंपट होता आणि त्याने सीताहरणाच्या आधीही अनेक स्त्रियांना पळवून आणून त्यांचा उपभोग घेतला असल्याची अनेक उदाहरणे रामायणाचा अभ्यास केल्यावर आपल्या लक्षात येतील. एका अप्सरेचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्यावर रावणाला ब्रहमदेवाकडून शाप मिळाला होता, की यापुढे त्याने कोणत्याही स्त्रीचा बळजोरीने उपभोग घेण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्या मस्तकाची शेकडो शकले होतील. याशिवाय सीतेच्या पातिव्रत्यामुळे रावणाला सीतेला स्पर्श करणे नंतर कधीच शक्य झाले नाही. रावणाची दुष्कर्मे जाणून घ्यायची असतील तर आधी रामायणाचा अभ्यास करायला हवा. विजयादशमी जवळ आली कि काही नास्तिक विचारसरणीची पुरोगामी मंडळी रावण हा दानशूर ब्राह्मण होता. त्याने केवळ आपल्या बहिणीच्या अपमानाचा सूड म्हणून सीतेचे हरण केले; मात्र सीतेचा शीलभंग करण्याचा त्याने कधीच प्रयत्न केला नाही त्यामुळे त्याचे दरवर्षी प्रतीकात्मक दहन करणे चुकीचे असल्याचे बरळू लागतात. भारतीय संस्कृतीशी अथवा येथील पौराणिक संदर्भांशी काही देणेघेणे नसलेली ही मंडळी हिंदूंच्या सण उत्सवांमध्ये आडकाठी आणण्यासाठी लोकांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करत असतात. दरवर्षी विजयादशमीच्या दिवशी केले जाणारे रावण दहन हे सत्प्रवृत्तीने दुष्प्रवृत्तीवर, सत्याने असत्यावर मिळविलेल्या विजयाचे प्रतीक असून या प्रथेला विरोध करण्याचे काहीच कारण नाही. **– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

दिनविशेष

स्वाध्याय परिवार प्रणेते पांडुरंगशास्त्री आठवले



१९ ऑक्टोबर हा दिवस म्हणजे तत्त्वचिंतक आणि वैश्विक स्वाध्याय परिवाराचे प्रवर्तक पद्मविभूषण पांडुरंगशास्त्री आठवले यांचा जन्मदिवस. १९ ऑक्टोबर हा या महापुरुषाचा जन्मदिवस वैश्विक स्वाध्याय परिवार 'मनुष्य गौरव दिन' या सार्थ नावाने साजरा करतो. आपल्या देशांत असंख्य प्रज्ञावान व्यक्तिमत्त्वे जन्मली आणि पांडुरंगशास्त्री हे अशाच रचनात्मक कार्य करणाऱ्या दुर्मीळ महापुरुषांपैकी एक अग्रणी नाव.

आठवले यांचा प्रवास ज्ञान आणि सत्याच्या शोधातून सुरू झाला. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी वडिलांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांनी प्राचीन भारतीय धर्मग्रंथ आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात स्वतःला झोकून दिले, तसेच वेद, उपनिषदे आणि भगवद्गीतेतील ज्ञानाचा सखोल अभ्यास केला. याच आध्यात्मिक पायांनी त्यांच्या जीवनकार्याला आकार दिला आणि अधिक सुसंवादी व दयाळू समाजाच्या त्यांच्या दूरदृष्टीला मार्गदर्शन केले.

मानवी आध्यात्मिक विकासाच्या या पायऱ्या आहेत. ते नेहमी सांगत की तत्त्वमसि आणि अहं ब्रह्मास्मि सारखी महावाक्ये ही केवळ सिद्धांच्या अनुभूतीचा विषय नाहीत तर सामान्य साधकाला त्यांचा काठीसारखा उपयोग होतो. सारांश त्यांनी हे प्रतिपादित केले की, चराचर सृष्टि चालवणारी शक्ती तुझ्याबरोबर आहे, तुझा आणि त्याचा संबंध आहे. इतकंच नाही तर ती शक्ती जशी तुझ्याबरोबर आहे तशीच दुसऱ्याबरोबर सुद्धा आहे. त्यामुळे तुझा आणि दुसऱ्याचा परस्पर संबंध आहे. हृदयस्थ भगवंत, त्याचा संबंध आणि सर्वांत बसलेल्या त्या शक्तीमुळे आपल्या सर्वांचा परस्पर दैवी भ्रातृभाव उभा राहू शकतो हे त्यांनी सांगितले.

मनुष्य गौरवाचा विचार हे ही त्यांचे एक अतुलनीय योगदान. ते नेहमी म्हणत की, आज समाजात बाह्य आभूषणांशिवाय गौरवच मिळत नाही. ज्याच्याकडे वित्त आहे, सत्ता आहे, विद्या आहे, कीर्ती आहे त्यालाच किंमत मिळते. पण ही सर्व आभूषणे नसतील तर माणसाला किंमतच नाही का? समाजातील बहुतांश लोकांकडे विद्या, वित्त, सत्ता, कीर्ती, यातील काहीच नाही आणि ते नसल्यामुळे जर त्यांना गौरव मिळणारच नसेल तर आपण खरोखरच सुधारलो आहोत का हा विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी ठामपणे सांगितले की तुझ्याकडे या प्रस्थापित शक्तींपैकी काहीही नसेल कदाचित, पण तुझ्याजवळ तुझा राम आहे, चराचर सृष्टी चालवणारा भगवंत माणसात येऊन राहिला आहे हाच माणसाचा सर्वात मोठा गौरव आहे.

त्यांना त्यांच्या अद्वितीय अशा रचनात्मक कार्यासाठी रॅमन मॅगसेसे, टेम्पल्टन अशा मानाच्या आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी तर पद्मविभूषण, लोकमान्य टिळक पुरस्कार, महात्मा गांधी पुरस्कार, राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार, राष्ट्रभूषण पुरस्कार, दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठानचा आनंदमयी पुरस्कार, चतुरंग जीवगौरव पुरस्कार अशा अनेकानेक राष्ट्रीय पुरस्कारांनी आठवले यांना गौरविण्यात आले. अर्थात पुरस्कारांसाठी कधीही काम न केलेल्या दादांनी या सर्व पुरस्कारांचा भगवंताचे प्रेमपत्र या पवित्र भावनेने स्वीकार केला. अशा या मनुष्य गौरव प्रदाता आठवले यांना भावपूर्ण वंदन!

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ ऑक्टोबर

१) श्रीम. शिला रमाकांत मानकर अलिबाग, १९-१०-१९५१

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३०००/- असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते



कै. शकुंतला मधुसुदन अनगळ, स्मरणार्थ अलिबाग



श्री. वामनराव खाडे, ४ थे पुण्यस्मरण, अलिबाग



श्री. मनोज पुंडलिक पाटील, स्मरणार्थ, पिंपळभाट अलिबाग

पनवेल प्रदूषणाच्या विळख्यात

● शहरामध्ये पहाटे धुक्याचा भास ●नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

पनवेल शहरात पहाटेच्या वेळी हवेत धुक्यासारखे वातावरण दिसून येत असून, प्रत्यक्षात हवेत पसरलेल्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. सकाळी कामानिमित्त, धावण्यासाठी आणि व्यायामासाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना या वातावरणाचा सामना करावा लागत आहे.

पहाटेच्या वेळी शहरातील रस्ते, मोकळ्या जागा आणि उद्यानांमध्ये मॉर्निंग वॉकसाठी नागरिकांची वर्दळ असते. अनेक जण आरोग्य चांगले राहावे, यासाठी नियमित चालणे, धावणे आणि व्यायाम करण्याला प्राधान्य देतात. मात्र, हवेत धुरकटपणा जाणवत असल्याने सकाळच्या स्वच्छ हवेचा आनंद घेण्याऐवजी प्रदूषणाचा सामना करावा लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.



पनवेल परिसरात वाढती वाहनांची वर्दळ, बांधकामांमधून उडणारी धूळ तसेच इतर प्रदूषणकारी घटक यांमुळे हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र, सध्या जाणवणाऱ्या धुरकट वातावरणामागील नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी हवेच्या गुणवत्तेची अधिकृत आकडेवारी आणि संबंधित यंत्रणेची तपासणी आवश्यक आहे.

काळजी घेण्याचे आवाहन

हवेची गुणवत्ता खराब असल्यास लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. नागरिकांनी हवेच्या गुणवत्तेची अधिकृत माहिती तपासून त्यानुसार बाहेरील व्यायामाचे नियोजन करावे, असे आवाहन केले जात आहे.

हवेच्या गुणवत्तेची तपासणी करण्याची मागणी

पनवेलमधील पहाटेच्या धुरकट वातावरणाची संबंधित यंत्रणांनी दखल घेऊन हवेच्या गुणवत्तेची तपासणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शहरातील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कधी होणार, असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पहाटेच्या वेळी हवेत धुक्यासारखा थर दिसत असल्याने काही नागरिकांना हे नैसर्गिक धुके असल्याचा भास होतो. मात्र, धुके आणि प्रदूषणामुळे निर्माण होणारा धुरकटपणा यांमध्ये फरक असतो. त्यामुळे केवळ दृश्य स्वरूपावरून हवेची गुणवत्ता ठरवता येत नाही.



क्षयमुक्त ग्रामपंचायतींचा गौरव

। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

सेवा संकल्प अभियान अंतर्गत रोहा तालुक्यातील ६४ ग्रामपंचायतींपैकी सन-२०२५ मध्ये क्षयमुक्त झालेल्या ३७ ग्रामपंचायतींना क्षयमुक्त ग्रामपंचायत म्हणून गौरविण्यात आले. या ग्रामपंचायतींना सुवर्णपदक, रजत, आणि काश्यपदकाचे महात्मा गांधीजींचे पुतळे आणि प्रमाणपत्र देऊन महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

येरळ ग्रामपंचायतचे हे पहिले वर्ष असून या ग्रामपंचायतीला सिल्वर पदक मिळाले. तर चिंचवली तर्फे दिवाळी ग्रामपंचायतचे तिसरे वर्ष असून या ग्रामपंचायतीला गोल्डन पदक प्राप्त झाले आहे. यावेळी रोहा तहसीलदार, क्षयरोग विस्तार अधिकारी, उपविभागीय अधिकारी, सभापती, उपसभापती, गट विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती सदस्य, येरळ ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामसेवक, तसेच सर्व आशाताई, विविध परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

माथेरान रेल्वे मार्गालगत बिबट्याचे दर्शन

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरातील मिनी ट्रेन रेल्वे मार्गाच्या बाजूला अमन लॉज परिसरात रात्रीच्या वेळी अनेक पर्यटकांना बिबट्याचे दर्शन झाले. मात्र त्यावेळी खबरदारी न घेता अनेक पर्यटकांकडून स्वतः जीव धोक्यात घालून फोटो सेशन केले जात होते. दरम्यान, माथेरानचे वेगवेगळ्या भागात बिबट्याचे दर्शन होत असून स्थानिकांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर पडू नये, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

माथेरानमधील अमन लॉज रेल्वे स्टेशन येथील अमन लॉज बंगला येथे उन्हाळ्यात वर्षानुवर्षे बिबट्या पाणी पिण्यासाठी येत असल्याची तेथील बंगल्याचे केअर टेकर यांचे म्हणणे आहे. रेल्वे स्थानकाजवळील जंगल परिसरात शनिवारचे रात्री बिबट्याचे दर्शन झाले आहे. रात्रीच्या सुमारास मिनी ट्रेनच्या रुळाशेजारी असलेल्या लोखंडी खोक्यावर हा बिबटा आरामात पहुडला होता. अमन लॉजजवळील एका शेडवर बिबट्या बसला असून काही पर्यटक थेट रेल्वे रुळावर उभे राहून त्याचे फोटो आणि व्हिडीओ काढत आहेत. हा प्रकार अत्यंत धोकादायक असून जीवावर बेतू शकतो. मात्र पर्यटक हे बिबट्यापासून २० मीटरचे अंतरावर राहून फोटो व्हिडिओ काढत होते. या प्रकाराबद्दल माथेरान वन विभागाने आणि जागरूक नागरिक यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

याआधीही दर्शन

हा काही पहिलाच प्रकार नाही. याआधी देखील माथेरानचे स्थानिक नागरिक महेंद्र जाबरे यांना माथेरानच्या घाटात बिबट्या दिसला होता. तसेच काही दिवसांपूर्वी देखील माथेरानच्या जंगल परिसरात दोन-तीन वेळा बिबट्याचे दर्शन झाल्याच्या घटना घडल्या आहेत. माथेरान हे घनदाट जंगल क्षेत्र असून येथे बिबट्याचा नैसर्गिक अधिवास आहे.

कुत्र्याचा फडशा

माथेरान शहरातील इको पॉईंट परिसरातील हनिमून पॉईंट येथे बिबट्याने मध्यरात्री येऊन कुत्र्यावर हल्ला केला होता. त्या सर्व प्रकारचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता.

वनविभागाचे आवाहन

वनविभागाने माथेरानमध्ये जागोजागी जनजागृतीचे फलक लावले आहेत. पर्यटकांनी या फलकांवरील नियमांचे पालन करावे. जंगल परिसरात रात्रीच्या वेळी एकटे फिरणे टाळावे. बिबट्या दिसल्यास फोटो काढण्याचा प्रयत्न करू नये, वन विभागाच्या नियमांकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन वनक्षेत्रपाल गायकवाड यांनी केले आहे.

दिनांक : १९ ऑक्टोबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे - वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
१) विलास बबन देशमुख २) बळवंत बबन देशमुख ३) कुंदा विनायक देशमुख ४) किशोर विनायक देशमुख ५) केदार विनायक देशमुख ६) विजया विनोद देशमुख ७) रिना किशोर देशमुख ८) मंजुला अर्जुन देशमुख	६९	१	०-४१-००	३	१९

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १९/१०/२०२६

रस्त्याच्या संरक्षण भिंतींचे काम सुरु

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील माथेरान-नेरळ-कळंब या राज्यमार्ग रस्त्यावर कोल्हारे ग्रामपंचायतमधील साई मंदिर येथे रस्त्यालगत अतिक्रमण करून दुकाने थाटण्यात आली होती. ही अतिक्रमण करून बांधलेली दुकाने रस्त्याच्या कामासाठी अडथळे ठरत असल्याने बाजूला करण्यात आली आहेत. त्यानंतर त्या भागातून रस्त्याच्या दुतर्फा संरक्षण भिंत बांधण्याच्या कामाला गती मिळाली आहे.



माथेरान-नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यालागत असलेली अतिक्रमणे काढून टाकण्याची मागणी सातत्याने होत आहे. या रस्त्यावर काँक्रिटीकरणाचे काम मंजूर असून राज्य सरकारच्या एमएसआयडीसीमधून सुरु आहे. या रस्त्याच्या कामामध्ये कोल्हारे ग्रामपंचायतमधील साई मंदिर भागातील रस्त्यालगत असलेली अतिक्रमणे अडथळा ठरत होती. त्यामुळे स्थानिक पातळीवर अतिक्रमण करणारे हे सर्व स्थानिक आजुबाजुंच्या गावातील रहिवासी असल्याने त्यांची कुटुंब उघड्यावर येऊ नये, यासाठी सहकार्याची भूमिका एमएसआयडीसीकडून घेण्यात आली. सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या मध्यापासून साडे सात फूट अंतरावर जागा सोडण्यास सुचवण्यात आले. त्यानंतर रस्त्यालगत असलेली अतिक्रमणे बाजूला काढण्याचे काम संबंधित स्थानिक दुकानदार यांनी केले आणि बांधकाम खात्याला सहकार्य केले.

त्यानंतर आता साई मंदिर भागात काँक्रीटीकरण झालेल्या रस्त्याच्या आजूबाजूला संरक्षण भिंत बांधण्याच्या कामाने गती घेतली आहे. आगामी काळात येत असलेली दिवाळी सण लक्षात घेऊन बांधकाम विभागाने अतिक्रमण दूर झाल्यानंतर तात्काळ रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे.

पान ३ वरुन

खेळाडूंच्या धावपट्टीवर चारचाकी सुसाट

देण्याबाबत कोणते नियम आहेत आणि त्यांची अंमलबजावणी कशी केली जाते, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या प्रकाराबाबत कृषीवलच्या प्रतिनिधींनी क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्याशी विचारणा केली असता, संबंधित घटनेची आपल्याला माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, रविवारी सुट्टीचा दिवस असल्याचे सांगत, तेथे सरावासाठी येणाऱ्या खेळाडूंनी संबंधित व्यक्तीला अडवायला हवे होते, अशी भूमिका त्यांनी मांडली. मात्र, क्रीडा संकुलातील धावपट्टीवर एक व्यक्ती वाहन वेगाने फिरवत असेल, तर अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. तसेच, नेहूली क्रीडा संकुलाची दुरवस्था दूर करून खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच संकुलाच्या सुरक्षेकडेही प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा, खेळाडूंच्या सरावासाठी उभारलेल्या क्रीडा सुविधांचा असा गैरवापर सुरूच राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अवैध बंदूक बाळगल्याप्रकरणी गुन्हा

काडतुसे आढळून आली. त्यांच्याकडे बंदूक जवळ बाळगण्याचा किंवा बंदूक वापरण्याचा परवाना नसतानाही त्यांच्याकडे हा मुद्देमाल दिसून आला. त्यामुळे सातारा येथील प्रथमेश उद्धव निकम (३०) आणि अजित अशोक राजपुरे (३६) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मंगेश मुंडे अधिक तपास करत आहेत.

पंतप्रधानांच्या सोहळ्याला पर्यावरणप्रेमींचा निषेध

आदिवासी आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आंदोलनाला पाठिंबा दिला. सचिन गायकवाड यांनी पाली भूतिवली धरणग्रस्तांना ३० वर्ष यातना सोसाव्या लागत आहे, हे सांगत तालुक्यातील वनविभागाच्या जमिनी मोठ्या प्रमाणात प्रकल्पांमध्ये बाधित होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. पोशिर धोरणाबाबत बोरगाव शेतकरी मंडळाचे अध्यक्ष तानाजी चव्हाण यांनी सविस्तर मांडणी करुन पोशीर धरण कुठल्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, अशी भुमिका मांडली. तसेच, यापुढे सर्व प्रकल्पग्रस्तांनी एकत्र येऊन लढले पाहीजे, असे मत मांडले. शिलार धोरणाबाबत सुद्धा अनेक ग्रामस्थांनी शिलार धरण नको, अशी भुमिका मांडली.श्रीखंडे यांनी टोरेंटचा सुरू असलेला मनमानी कारभार, दादागिरी याबाबत सविस्तर मांडणी करुन टोरेंट प्रकल्पाला विरोध केला. कोंढाणा धरणाबाबत सामाजिक कार्यकर्ते रमेश कदम यांनी या धरणाचा स्थानिकांना काही फायदा नाही, असे मत मांडून आंदोलनाला पाठींबा दिला. तसेच, राजेश लाड, प्रविण गांगल, देशमुख, मालू निरगुडा अशा अनेक मान्यवरांनी आपले मत मांडून पुढील प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनाला जाहीर पाठींबा दिला.

४०० लिटर गावठी दारू जप्त

सुमारास अलिबाग-रोहा मार्गावर वावे नाका ते वळवळी गावादरम्यान करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गावठी हातभट्टीची दारू विक्रीसाठी पुरवठा करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी संबंधित वाहनावर कारवाई केली आहे. यावेळी दारूने भरलेल्या रबरी ट्यूब आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये अंदाजे ३ लाख रुपये किमतीची कार आणि गावठी हातभट्टीची दारू यांचा समावेश असून, एकूण मुद्देमालाची किंमत ३ लाख ४२ हजार २०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेवदंड्याचे पोलीस निरीक्षक सुजीत गडदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सुधीर पाटील या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मोदींच्या स्वागतासाठी रस्त्यांची डागडूजी

चर्चा आहे. त्यांच्या स्वागतासाठी कर्जत तालुक्यात रस्त्यांच्या कामांना वेग आल्याचे चित्र आहे. दि.३ नोव्हेंबर रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पुणे जिल्ह्यातील बारामती येथे कार्यक्रमासाठी येत आहेत. त्यानंतर दुसऱ्या सत्रात नरेंद्र मोदी हे कर्जत तालुक्यात येणार असल्याची चर्चा आहे. या अनुषंगाने भालिवडी ग्रामपंचायत मधील पुलाची वाडी लाखाची वाडी येथे बनवण्यात आलेल्या हेलिपॅड पासून कार्यक्रमास्थळी जाणारा रस्ता नव्याने बनविला जात आहे. आंबिवली फाटा ते भीमाशंकर घाट रोड या रस्त्यालगत नागेरे फाट्यावरून जाणारा हा रस्ता बीएसआय ट्रेनिंग सेंटरच्या जवळून सावळे गावाकडे जाणारा पायी रस्ता होता. हा रस्ता अद्याप कोणत्याच निधीतून करण्यात आला नव्हता. परंतु, फक्त मोदी यांच्या आगमनाच्या निमित्ताने येथील अस्तित्वात नसलेल्या आणि केवळ बैलगाडी वाट असलेल्या रस्त्याचे कामाला वेग मिळाला असून, नव्याने रस्ता बनवला जात आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी सरकारकडे पैसे नसताना मोदींच्या स्वागतासाठी पैशांची उधळपट्टी केली जात असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

बीज संवर्धन दुर्गा : राहीबाई पोपेरे

ठेवता भविष्यातल्या सुदृढ पिढ्यांच्या निरोगी आरोग्यासाठी तो मुक्त हस्ते वितरित केला. आजही कित्येक शेतकऱ्यांना बियाणांच्या लागवडीबाबत त्या आत्मीयतेने मार्गदर्शन करत असतात.

एकीकडे एकविसाव्या शतकात जगणाऱ्या जनतेला, राजकारणी स्वतःच्या स्वार्थासाठी पन्नासाव्या शतकाची खोटी दिवास्वप्नं दाखवत आहेत. तर दुसरीकडे शेताच्या बांधावर बसलेल्या अशिक्षित राहीबाई, मागच्या पन्नास वर्षातल्या निरोगी जीवनाचा दाखला देऊन, भविष्यातल्या सुदृढ पिढीसाठी ''शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी'' हा मौलिक संदेश सत्यात उतरवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत.

भारत सरकारने त्यांच्या या सेवाभावी कार्यासाठी त्यांना पद्मश्री देऊन सन्मानित केलं, तर जगप्रसिद्ध ब्रिटिश प्रसारण महामंडळाने (बीबीसी) त्यांना जगातल्या शंभर प्रभावशाली महिलांमध्ये स्थान दिलं. हा सन्मान एकट्या राहीबाईंचा नसून आपल्या मातीचा आणि गावरान बियाणांच्या प्रसार, प्रचार आणि लागवडीसाठी, जीव ओतून काम करणाऱ्या तुमचा आमचा सगळ्यांचा आहे.

शासनाने शेतकरी दाखल्याची खिरापत वाटली असली तरी माझ्याकडे थोडीसुद्धा शेती किंवा अन्य जमीन नाही. पण एक सामान्य माणूस म्हणून माझी धारणा ठाम आहे की, निकोप अन्न हाच खऱ्या विकासाचा पाया आहे, कारण शरीर निरोगी असेल तरच संपत्ती आणि ऐश्वर्याचा उपभोग घेता येतो. म्हणूनच हा विचार केवळ बोलून न दाखवता प्रत्यक्ष कृतीतून जगणाऱ्या बीजमाता राहीबाई पोपेरे यांचं कार्य अनमोल आहे.

शेताच्या बांधावर बसून ''शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी'' ही उक्ती आपल्या कार्यातून सार्थ ठरवणाऱ्या, आणि देशी बियाण्यांचा अनमोल ठेवा जिवापाड जपणाऱ्या, बीजमाता राहीबाई पोपेरे यांच्या तळमळीच्या कार्यकर्तुत्वाला नवरात्रीच्या समारोपाची नववी माळ कृतज्ञतापूर्वक अर्पण.

निवडक

म्हसळ्यात 'नवदुर्गा सन्मान सोहळा'

म्हसळा : म्हसळा शहरात नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीच्या वतीने दक्षिण रायगड महिला जिल्हा संघटिका डॉ. स्वीटी गिरासे यांच्या संकल्पनेतून 'नवदुर्गा सन्मान सोहळा' उत्साहात पार पडला.



यावेळी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व समाजोपयोगी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. म्हसळा शहरातील बेलदारवाडी, आदिवासीवाडी, कुंभारवाडा, सोनार आळी आणि तांबट आळी येथील नवरात्रोत्सव मंडळांमध्ये हा सन्मान सोहळा पार पडला. महिलांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे आणि समाजातील त्यांच्या योगदानाचा गौरव करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. नवरात्रोत्सवाच्या धार्मिक वातावरणात महिलांच्या सन्मानातून समाजप्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांसह विविध नवरात्रोत्सव मंडळांनी कौतुक केले. तर सन्मानित महिलांनी आयोजकांचे आभार मानले.

■ (छायाचित्र : संजय गायकवाड)



गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

कर्जत : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून माणगाव जिल्हा परिषद वॉर्डमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने एक स्तुत्य व सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. रा.जि.प.शाळांमध्ये गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना एकूण दोन हजार वह्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी परिसरातील डिकसळ, पाली, उमरोली, आशाने, कोषाने, वावे, उक्रूळ, बार्डी, वडवली, आसल, भुतीवली, आसल पाडा, आशाने ठाकूरवाडी, आणि भानसोली येथील रायगड जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. शिक्षण हेच प्रगतीचे मूळ आहे, याच विचाराने सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे युवा नेते सागर शेळके यांनी सांगितले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्थानिक लोकप्रतिनिधी, ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



■ (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

सि.एस.एन. विद्यालयात सायबर जनजागृती

आगरदांडा : मुरुड पोलीस ठाण्यातर्फे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीतील सि.एस.एन. विद्यालयात सायबर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. पोलीस अतुल बागवे व सुमित वाकार्डे यांनी यावेळी विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांविषयी माहिती दिली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच एक तासाच्या आत १९३० या क्रमांकावर आपली तक्रार नोंदवल्यास असे गुन्हे त्वरित उघडकीस आणले जाऊ शकतात, असे सांगितले. आजकालच्या जमान्यात थेट चोरी, डाके तसेच दरोड्यांचे प्रमाण कमी झाले असले तरी सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. त्याकरीता सर्वांनी सजग राहून मोबाईलवरुन येणारे फ्रॉड कॉल, मेसेजेसला बळी न पडता केवळ जरुरी पुरतेच वापर करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत, मंगेश नांदगावकर, दत्तात्रय खुळपे, अमर दरणे, एम.टी. अहिरे, राहिल घलटे, योगेश पाटील, भारत चव्हाण, सागर राऊत, भारती बांद्रे, नियती ठमके, शिल्पा कळके, प्रितम शेडगे, राऊत, डोंगरीकर तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विद्यार्थिनींनी गिरवले योगाचे धडे

खांब : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमांसोबतच आरोग्यविषयक उपक्रमही महत्त्वाचे असतात. याच उद्देशाने शारदोत्सव कार्यक्रमांतर्गत विद्यार्थिनींसाठी योग व प्राणायाम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून विद्यार्थिनींना योगाचे महत्त्व समजावून सांगतानाच विविध योगासनांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. योग गुरुकुल अकॅडमी, नागोठणेच्या संस्थापिका यामिनी माळी-दिघे यांनी विद्यार्थिनींना योग, प्राणायाम आणि निरोगी आरोग्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. योगामुळे शरीर सुदृढ राहण्यास, मन एकाग्र होण्यास आणि मानसिक तणाव कमी होण्यास मदत होते, याची माहिती त्यांनी विद्यार्थिनींना दिली. यावेळी यामिनी माळी-दिघे यांची कन्या ओवी हिनेही विविध योगक्रियांची प्रात्यक्षिके सादर केली. तर नृत्याच्या माध्यमातून विविध यौगिक क्रियांचे सुंदर दर्शन घडविले. तिच्या या आगळ्यावेगळ्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थिनींना योगासनांचा प्रत्यक्ष सराव करण्याची संधी मिळाली.

रिलायन्स कंपनीतून साहित्य चोरीला

रसायनी : पाताळगंगा येथील रिलायन्स कंपनीच्या पी.टी.एस. स्टोअर्समधून अडीच लाख रुपयांचे साहित्य चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीत नोकरीला असलेले फिर्यादी प्रतीक जितेंद्र भिंगारदिवे (३२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चोरट्यांनी कंपनीच्या स्टोअर्समधून कोणतीही परवानगी न घेता तांब्याची कॉपर ट्युब्स (१० किलो वजन, किंमत दहा हजार रुपये), कॉपर वाइंडिंग केबल (२३ किलो वजन, किंमत तेवीस हजार रुपये) आणि डिचार्ज रॉड-६ फूट लांबीचे एकूण सात नग (किंमत २ लाख, सतरा हजार रुपये) असे एकूण दोन लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवला.

पनवेलमध्ये अतिक्रमणांवर महापालिकेचा दणका

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिका हद्दीतील रस्ते व पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महापालिकेने धडक मोहीम हाती घेतली असून, कामोठे, पनवेल, कळंबोली आणि खारघर परिसरात अनधिकृत फेरीवाले, भाजी विक्रेते, हातगाड्या, नर्सरी तसेच दुकान-हॉटेलच्या बाहेरील अनधिकृत शेडवर कारवाई करण्यात आली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार सुरू असलेल्या या मोहिमेत काही ठिकाणी टेम्पो व हातगाड्या जप्त करण्यात आल्या असून, अतिक्रमणे हटविण्यासाठी जेसीबीचा वापर करण्यात आला.



कामोठ्यात भाजी विक्रेत्यांवर कारवाई

कामोठे सेक्टर २१ आणि २२ मध्ये रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या भाजी विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. यावेळी काही टेम्पो जप्त करण्यात आले. तसेच खांदा कॉलनी परिसरातही अतिक्रमणविरोधी मोहीम राबविण्यात आली.

पनवेलमध्ये हातगाड्यांवर तोडक कारवाई

पनवेल मार्केट यार्ड परिसरातील रस्त्यावर अनधिकृतपणे लावण्यात आलेल्या हातगाड्यांवर महापालिकेच्या पथकाने तोडक कारवाई केली.

यावेळी हातगाड्यांसह त्यावरील सामान जप्त करण्यात आले. दरम्यान, नवीन पनवेल येथील डी-मार्टसमोरील परिसरात अनधिकृत बाजार भरू नये, यासाठी अतिक्रमणविरोधी पथकातील कर्मचारी आणि सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत.

कळंबोलीत नर्सरी, भाजी विक्रेत्यांवर कारवाई

कळंबोली परिसरातही अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. पोलीस मुख्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. गणपती तलावाजवळील अनधिकृत नर्सरीवरही कारवाई करण्यात आली. तसेच रोडपाली बस डेपो परिसरातील अनधिकृत भाजी विक्रेत्यांवर कारवाई करून भाजीपाला जप्त करण्यात आला. कळंबोली सेक्टर २० मध्ये दुकाने व हॉटेल्सच्या बाहेरील अनधिकृत शेडवर जेसीबीच्या सहायाने मोठी तोडक कारवाई करण्यात आली. यावेळी उपायुक्त रविकिरण घोडके उपस्थित होते.

खारघरमध्ये अनधिकृत नर्सरींवर कारवाई

खारघर परिसरातील अनधिकृत नर्सरी तसेच फुटपाथवर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर महापालिकेच्या पथकाने कारवाई केली. पदपथांवरील अतिक्रमणे हटवून नागरिकांसाठी मार्ग मोकळा करण्यावर महापालिकेने भर दिला आहे.

आसूडगाव पेट्रोल पंपाजवळील पदपथावर करण्यात आलेली अतिक्रमणे तसेच अनधिकृत नर्सरी अतिक्रमण विभागाच्या पथकाने हटविली. त्यामुळे परिसरातील पदपथ नागरिकांसाठी मोकळे करण्यात आले आहेत. कामोठे, खारघर, पनवेल आणि कळंबोली परिसरातील रस्ते व पदपथांवरील अतिक्रमणे हटविण्यावर महापालिकेने विशेष भर दिला आहे. अनधिकृत व्यवसाय, हातगाड्या, नर्सरी आणि रस्ते-पदपथांवरील अतिक्रमणांविरोधातील मोहीम यापुढे आणखी तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी दिली.

निवडक



मोफत विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबीर

खांब : लायन्स क्लब कोलाडच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत रोहा तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचालित द न्यू इंग्लिश स्कूल, विठ्ठलवाडी हायस्कूल येथील विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये डॉ.गांधी नर्सिंग होम कोलाड आंबेवाडी येथील प्रसिद्ध जनरल सर्जन तथा कोलाड लायन्स क्लबचे उपाध्यक्ष डॉ. विनोद गांधी यांनी उपस्थित दर्शवून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. बदलत्या हवामानामुळे होणारे आजार आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य या पार्श्वभूमीवर या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याला विद्यार्थी वर्गाने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद शंविला. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ.श्याम लोखंडे, उपाध्यक्ष तथा तपासनीस आलेले तज्ञ डॉ.विनोद गांधी, मुख्याध्यापक गौतम जाधव, सह शिक्षिका सुप्रिया जाधव, कस्तुरी जाधव,तसेच ऋषिकेश महाडिक, कर्मचारी सुजित लोखंडे, नितेश पोटफोडे सह आदी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

चिरनेर : रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर ए.एस. सी.कॉलेज महालण विभाग फुंडे येथे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. वाचन प्रेरणा दिनाची संकल्पना रीड विथ कॉफी अशी होती. कॉफी घेत साधारण अर्ध्या तासात वाचन होऊ शकेल अशा विविध कथा, साप्ताहिके, वर्तमानपत्रातील कात्रणे यांचे प्रदर्शन ग्रंथालय विभागातर्फे आयोजित करण्यात आले होते. यावेळी ग्रंथपाल सुप्रिया नवले यांनी प्रास्ताविकेतून हा कार्यक्रम आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली. तर उपस्थित प्राध्यापक वर्गाला प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. संदीप घोडके यांच्यासह अन्य प्राध्यापक उपस्थित राहून प्राध्यापकांनी कॉफीचा आस्वाद घेत अर्धा तास ग्रंथालयात बसून वाचन केले. विशेष म्हणजे या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथालय विभागातील नर्मदा खरपडे व कमल बंगारे यांचे विशेष सहकार्य लाभले.



आरोग्य विषयावर मार्गदर्शन सत्र

कोलाड : गोवे येथे मिशन फिट इंडिया अंतर्गत शारदीय नवरात्र उत्सव जागर स्त्री शक्तीचा या कार्यक्रमानिमित्ताने महिलांचे व कुटुंबाचे आरोग्य या विषयावर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक आरोग्य सल्लागार मोहिनी लिलाधर कापसे यांनी महिलांचे व कुटुंबाचे आरोग्य एकमेकांशी निगडित असून महिलांनी आपल्या स्वतःच्या आरोग्याबरोबरच कुटुंबाच्या आरोग्याची ही काळजी कशी घेतली पाहिजे याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी कोलाड केंद्राचे केंद्रप्रमुख नथू खानेकर आवर्जून उपस्थित होते. केंद्रप्रमुखांनी सदरहू उपयुक्त अशा उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल गोवे शाळा शिक्षक वृंद व शाळा व्यवस्थापन समिती यांचे कौतुक केले.सदर कार्यक्रमास पालक व महिला वर्ग बहुसंख्येने उपस्थित होत्या. शाळेच्या मुख्याध्यापिका रुपाली अजय कापसे यांनी आरोग्य हीच आपली सर्वश्रेष्ठ संपत्ती असल्याने या सत्राचे आयोजन केल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सहशिक्षिका प्रतीक्षा बाळासाहेब बडे यांनी केले.हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी शा. व्य. समिती गोवे अध्यक्ष विजय जाधव, उपाध्यक्ष मेघना जवके, सदस्या सुविधा कापसे, प्राजक्ता दहिंबेकर, प्रिया जवके, पालक विधी जाधव, अंगणवाडी सेविका सुजाता जाधव यांचे विशेष सहकार्य लाभले.

वीजचोरी प्रकरणी गुन्हा दाखल

पनवेल : वीजचोरी केल्याप्रकरणी जिथीन कानापल्ली यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कानापल्ली यांच्या बर्फाच्या कारखान्याच्या वीज वापरासाठी सहा फेब्रुवारी ते जुलै २६ या महिन्यांमध्ये वीज चोरी करून म हावितरण कंपनीची १६ लाख ५६ हजार ३०० रुपये किमतीचे नुकसान करण्यात आले. याबाबत त्यांना वीज चोरीचे देयक देण्यात आले होते.

'तरुणाई व वाचन संस्कृती' विषयावर राष्ट्रीय वेबिनार

। तळा । प्रतिनिधी ।

भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त साजरा करण्यात येणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून . डी.जी. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा ,जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला यांच्या संयुक्त विद्यमाने 'आजची तरुणाई व वाचन संस्कृती' विषयावर वेबिनार उत्साहात संपन्न झाले.



या वेबिनारचे अध्यक्ष स्थान ज्यांनी स्वीकारले ते उपाध्यक्ष चेअरमन तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ व जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य पुरुषोत्तम मुळे यांनीही सहभाग घेतला. त्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचा उल्लेख करून विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनकार्याचा आदर्श घ्यावा, जिद्द, चिकाटी आणि ज्ञानाची ओढ जोपासावी, असे आवाहन केले.

वेबिनारच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला येथील ग्रंथपाल प्रा. शुभदा विजयकुमार माने यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. आजच्या तरुण पिढीने सोशल मीडियाच्या क्षणिक आकर्षणातून बाहेर पडून पुस्तकांशी मैत्री करणे आवश्यक आहे. बाबा आमटे यांचे प्रकाशवाटा, किरण बेदी यांचे आय डीअर, किशोर शांताबाई काळे यांचे कोल्हाट्याचं पोर, शिवाजी सावंत यांचे मृत्युंजय, वि. स. खांडेकर यांचे ययाती, रणजित देसाई यांचे श्रीमान योगी आणि पु. ल. देशपांडे यांचे व्यक्ती आणि वल्ली यांसारखी पुस्तके वाचल्याने जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो. डिजिटल युगात प्रतिलिपी, मराठी पुस्तकालय, किंडल आणि स्टोरीटेल यांसारख्या माध्यमांचा वाचनासाठी उपयोग करता येतो. वक्त्यांनी स्वतःच्या बालपणीच्या वाचनानुभवातून वाचनाची आवड आणि व्यक्तिमत्त्व विकास यांचा संबंध स्पष्ट केला.

श्रीवर्धनमध्ये सप्टेंबर महिन्यासाठी धान्याचे नियतन मंजूर

। रायगड । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यासाठी सप्टेंबर २०२६ महिन्याचे धान्य नियतन मंजूर करण्यात आले आहे. अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेअंतर्गत एकूण ३,७४९.८० क्विंटल गहू व तांदळाचे नियतन मंजूर करण्यात आले असल्याची माहिती सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी स्वप्नील पडोळे यांनी दिली आहे.

अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत २२४० शिधापत्रिकांसाठी ३३६ क्विंटल गहू आणि ४४८ क्विंटल तांदूळ, असे एकूण ७८४ क्विंटल धान्य मंजूर करण्यात आले आहे.तसेच प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेअंतर्गत ५९,३१६ लाभार्थ्यांसाठी १,१८६.३२ क्विंटल गहू आणि १,७७९.४८ क्विंटल तांदूळ असे एकूण २,९६५.८० क्विंटल धान्य मंजूर करण्यात आले आहे.

अंत्योदय अन्न योजनेतील प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला १५ किलो गहू व २० किलो तांदूळ, तर प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेतील प्रत्येक लाभार्थ्याला २ किलो गहू व ३ किलो तांदूळ वितरित करण्याचे नियोजन आहे. पात्र लाभार्थ्यांनी संबंधित रास्तभाव धान्य दुकानातून निर्धारित प्रमाणात धान्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही पडोळे यांनी केले आहे.



संशोधनविषयक अतिथी व्याख्यानाचे आयोजन

। तळा । प्रतिनिधी ।

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करून वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या उद्देशाने जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे विद्यार्थी विकास कक्ष व रसायनशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने संशोधनविषयक अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

सांगली येथील संशोधन क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ डॉ. महेश खलाटे संचालक, इन्फिनाइट बायोटेक इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड ॲनालिटिक्स, यांनी या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. महेश खलाटे यांनी संशोधनाची प्रक्रिया, संशोधनातील विविध टप्पे, प्रयोगशाळेत वापरली जाणारी आधुनिक उपकरणे, त्यांची कार्यपद्धती तसेच संशोधनातील त्यांचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता संशोधनाची आवड जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

अलिबागवासियांच्या सेवेत चंदुकाका सराफ ज्वेल्सचे सुवर्णदालन दाखल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दागिन्यांच्या क्षेत्रात दोनशे वर्षांची समृद्ध परंपरा जपणारे चंदुकाका सराफ ज्वेल्स अलिबागकरांच्या आग्रहास्तव, सौंदर्य आणि सर्वोत्तम सेवेचा नवा अनुभव घेऊन भव्य स्वरूपात सादर झाले आहेत. चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या २५ व्या अलिबाग सुवर्णदालनाचा शुभारंभ सोहळा रविवारी (दि.१८) सकाळी १०:३० वाजता अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, नगरसेवक अंकित बंगेरा, चंदुकाका सराफ ज्वेल्सचे संचालक आदित्य शहा, संचालक साहस बागी व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



यावेळी बोलताना चंदुकाका सराफ ज्वेल्सचे संचालक आदित्य शहा म्हणाले की, वारसा, निष्ठा आणि परंपरा जपत, २०० वर्षांच्या समृद्ध वारशात दिमाखदार पदार्पण करणारी विश्वासाची सुवर्णपेढी म्हणजे चंदुकाका सराफ ज्वेल्स. अलिबागच्या सौंदर्यात अधिक भर घालण्यासाठी, चंदुकाका सराफ ज्वेल्स आता आपल्या भेटीला आले आहेत. आता अलिबागकरांसाठी सोनं, चांदी आणि हिऱ्यांच्या आकर्षक, पारंपरिक तसेच आधुनिक डिझाइन्सचा विशेष सुवर्णसंग्रह नव्या शोरूममध्ये एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे.

या शुभारंभानिमित्त अलिबागकरांसाठी खास आकर्षक ऑफर्स सादर करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांवर प्रति ग्रॅम केवळ ३.९९ टक्के ते ९.९९ टक्के मजुरी, हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर १०० टक्केपर्यंत सूट, तसेच चांदीच्या दागिन्यांच्या मजुरीवर ३० टक्के सूट मिळणार आहे. या विशेष ऑफर्स १८ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत लागू राहतील.

अलिबागमधील चेंढरे येथे सुरू होणारे हे नवीन शोरूम ग्राहकांना आधुनिक सुविधा, उत्कृष्ट सेवा आणि दर्जेदार दागिन्यांच्या विस्तृत संग्रहासह खरेदीचा अविस्मरणीय अनुभव देण्यासाठी सज्ज झाले आहे. शुभारंभानिमित्त सादर केलेल्या ऑफर्सचा सर्व अलिबागवासीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन चंदुकाका सराफ ज्वेल्स यांचे वतीने संचालक अतुल शहा, सिध्दार्थ शहा, आदित्य शहा यांनी केले आहे.

दिव्यांगांसाठी पुनर्वसन सेवा सुरू

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील दिव्यांग रुग्णांना पुनर्वसनविषयक तज्ज्ञ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथे ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन, मुंबई यांच्या सहकार्याने पुनर्वसन सेवा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्घाटन कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.



या कार्यक्रमाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबागच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, मुंबईचे संचालक डॉ. चंद्रशेखर टाकळीकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी, सहयोगी प्राध्यापक डॉ. विकास क्षीरसागर, डॉ. सुधारक बंटेवाड, डॉ. कृष्णा बडगिरे, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. फुसनाके तसेच मुंबई येथील डॉ. म्हामारे उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत मुंबई येथील फिजिओथेरपिस्ट आणि ऑक्युपेशनल थेरपिस्ट यांची तज्ज्ञ टीम दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथे भेट देणार आहे. यावेळी अस्थिरोग विभागाच्या बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) रुग्णांची तपासणी करून त्यांच्या गरजेनुसार पुनर्वसनविषयक मार्गदर्शन व उपचार करण्यात येतील. आवश्यकतेनुसार रुग्णांना संबंधित संस्थेमार्फत पुढील पुनर्वसन उपचारांसाठीही मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

या सेवेमुळे अलिबागसह रायगड जिल्ह्यातील गरजू दिव्यांग व्यक्तींना तज्ज्ञ पुनर्वसन सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

एक लाखाची फसवणूक

। पनवेल । प्रतिनिधी ।

कारसाठी घेतलेले पैसे परत न करता दुसऱ्या व्यक्तीला विकून एक लाखांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी अजान नासिर अली अन्सारी आणि शाहरुख मेहबूब पठाण यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

अजान अन्सारी आणि शाहरुख पठाण यांनी ओएलएक्सवर नादुरुस्त मोटर कारची जाहिरात टाकली होती. यावेळी फिर्यादी विक्रम बुचकूल (राहणार तळोजा फेसवन) यांना कार चांगल्या कंडिशन मध्ये असल्याचे सांगितले आणि ती त्यांना विकत देऊन त्यांच्याकडून ऑनलाइन एक लाख रुपये घेतले.

त्यानंतर त्या कारची टेक्निशियन कडे तपासणी केली असता ती नादुरुस्त असल्याचे समजले आणि ती कार त्यांनी त्या दोघांना परत केली. यावेळी त्यांनी पैसे परत न करता तीकार दुसऱ्या व्यक्तीला विकून त्यांची फसवणूक केली.

चवदार तळे परिसरातील झाडाच्या फांद्या तोडा नगरसेविका पूजा गोविलकर यांची मागणी

पक्षांच्या विष्ठेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात!

। महाड । प्रतिनिधी ।

महाड नगर परिषदेचे नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांचे अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत नगरसेविका पूजा गोविलकर यांनी आपल्या प्रभागातील चवदार तळ्यांच्या काठावर असलेल्या झाडांवर गळ्याचे वास्तव्य असून या बगळ्यांची विष्ठा चवदार तळ्यातील रस्त्यावर पडत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.





चवदार तळ्याच्या काठावर असलेली झाडे जर अशाच अवस्थेत ठेवली तर चवदार तळे सत्यग्रहाच्या शताब्दी वर्षनिमित्त चवदार तळ्यातील पाणी शुध्द व्हावे यासाठी केली जाणारी ओझोन ट्रिटमेंट व चवदार तळे परिसर सौंदर्यीकरण यावर शासनाकडून जो करोडो रुपये खर्च केला जातोय, तो या बगळ्यांच्या विष्ठेमुळे माती मोल होईल. त्यामुळे चवदार तळ्याच्या काठावर जी झाडे उंच वाढली आहेत ती बुंध्यापासून न तोडता त्यांच्या फांद्या व त्यांची उंची शन्य तितकी कमी करावी, अशी मागणी नगरसेविका पूजा गोविलकर यांनी नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांचेकडे केली.

या संदर्भात पक्षीमित्रांशी चर्चा केली असता या बगळ्यांचा प्रजनन काळ संपला असून या झाडांवर जी दोन-चार घरटी आहेत. तीही कमी होतील असे सांगितल्यांचे गोविलकर यांनी म्हटले. या बगळ्यांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात असल्यांचे पत्र अशोक मोरे यांनीही दिले, असल्याचे गोविलकर यांनी सांगत या बाबत तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी केली

गोमुखी आळी परिसरातील विकास वैद्य यांची पत्नी यांनाही या विष्ठेमुळे श्वसनाचा त्रास झाला होता त्यांना उपचारासाठी दोन वेळा हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले होते हे सभागृहांचे निदर्शनास आणून दिले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस डिड झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क : ८१८०८६१२३४/८१८०८५१२३४ एजंट क्षमस्व.
- अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५
- दिशा पॅथॉलॉजी लॅब, अलिबाग, महिला कर्मचारी पाहिजेत. रक्ताचे नमुने (Sample) पिकअप व ड्रॉप करण्यासाठी अट: स्वतःचे वाहन असणे आवश्यक. संपर्क: ८५५२८५५२८८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

कर थकबाकीदारांना अभय योजनेची प्रतीक्षा

शास्तीमाफीबाबत महापालिकेचा निर्णय प्रलंबित

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराची थकबाकी तब्बल १,७८९ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. सुमारे दोन लाख करदाते थकबाकीदार असल्याने महापालिकेच्या महसुलावर परिणाम झाला आहे. थकीत करावरील शास्ती माफ करण्यासाठी अभय योजना लागू करण्याची मागणी होत असली, तरी त्याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

महापालिका क्षेत्रात एकूण ३ लाख ७१ हजार ३३१ करदाते आहेत. २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत १ लाख ३३ हजार ५८२ करदात्यांनी २०२ कोटी रुपयांचा मालमत्ता



कर भरला आहे. मागील आर्थिक वर्षात १ लाख ७२ हजार ६८० करदात्यांकडून ६९२ कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात आला होता.

थकीत करावरील शास्तीची रक्कम मोठी असल्याने अभय योजना लागू केल्यास सुमारे ६४० कोटी रुपयांची शास्ती माफ होऊ शकते. त्यामुळे थकीत मूळ कर भरण्यास करदात्यांना प्रोत्साहन मिळून महापालिकेच्या करसंकलनात वाढ होण्याची शक्यता आहे.

> कर न भरणाऱ्यांना यापूर्वी अनेक संधी देण्यात आल्या आहेत. आता थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्तीची कारवाई केली जाईल. मालमत्ता कर वसुलीसाठी धडक मोहीम राबविण्यात येणार आहे. शास्तीमाफीबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.
>
> -मंगेश चितळे
> आयुक्त पनवेल महानगर पालिका

कर आकारणीसंदर्भात खारघर हाऊसिंग फेडरेशनने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सुरुवातीच्या साडेचार वर्षांच्या कालावधीतील कर व शास्तीबाबत न्यायालयाच्या अंतिम निर्णयाची प्रतीक्षा आहे. त्यामुळे अभय योजनेचा निर्णय घेताना न्यायालयीन बाबींचाही विचार करावा लागणार आहे.

महापालिका प्रशासनाकडून अभय योजनेबाबत माहिती मागविण्यात आली असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर शास्ती सवलतीचा अभ्यास केला जाणार आहे. सरसकट अभय योजना लागू करण्याऐवजी मध्यमवर्गीय घरांसाठी किती सवलत देता येईल, याचा अभ्यास केला जाईल. वेळेत कर भरणाऱ्या प्रामाणिक करदात्यांवर अन्याय होणार नाही, याचीही काळजी घेतली जाईल, असे महापौर नितीन पाटील यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी मालमत्ता कर आकारणी, शास्ती आणि थकबाकी वसुलीबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती सभागृहासमोर मांडण्याची मागणी केली आहे. महापालिका क्षेत्रातील २९ गावांमधील कर आकारणीचे दर आणि थकबाकी वसुलीची कार्यपद्धती जाहीर करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

'पैशांची उधळपट्टी खपवून घेणार नाही'

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेच्या परिवहन विकास आराखड्यातील १०० इलेक्ट्रिक बसच्या प्रस्तावावर महाविकास आघाडीचे नगरसेवक लतीफ शेख यांनी महासभेत आक्रमक भूमिका घेतली. सीएनजी आणि इलेक्ट्रिक बसच्या खरेदीपासून देखभाल व परिचालन खर्चापर्यंतचा तुलनात्मक अभ्यास सादर केल्याशिवाय कोट्यवधी रुपयांच्या खर्चाचा निर्णय घेऊ नये, अशी मागणी त्यांनी केली.

एकाच वेळी १०० इलेक्ट्रिक बस खरेदी करण्याऐवजी प्रथम २५ सीएनजी बस सुरू कराव्यात. प्रवाशांचा प्रतिसाद, मार्गांची गरज आणि परिचालन खर्चाचा आढावा घेऊन पुढील निर्णय घ्यावा, असे शेख यांनी सुचवले.

'अर्बन मास ट्रान्झिट' कंपनीने तयार केलेल्या परिवहन विकास आराखड्यात सीएनजी आणि इलेक्ट्रिक बसच्या खर्चाची, उपयुक्ततेची आणि दीर्घकालीन आर्थिक व्यवहार्यतेची तुलना सभागृहासमोर मांडण्यात आली नसल्याचा आक्षेप शेख यांनी घेतला. बस खरेदी, इंधन व वीज खर्च, देखभाल, बॅटरी बदलण्याचा संभाव्य खर्च आणि चार्जिंग सुविधांसाठी लागणारी गुंतवणूक यांचा सविस्तर अहवाल प्रशासनाने सादर करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शहरातील वाहतूक समस्या, प्रवाशांची संख्या, बसमार्ग, थांबे आणि नागरिकांच्या गरजांचा विचार करून आराखडा तयार होणे आवश्यक आहे. मात्र, आराखडा तयार करताना सत्ताधारी आणि विरोधी नगरसेवकांना विश्वासात घेतले नसल्याबद्दल शेख यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

पनवेलकरांना दर्जेदार, नियमित आणि परवडणारी सार्वजनिक वाहतूक सेवा मिळाली पाहिजे. मात्र, करदात्यांच्या पैशांचा विनियोग करताना आर्थिक व्यवहार्यता आणि पारदर्शकतेला प्राधान्य द्यावे. प्रशासनाने खर्चाचा संपूर्ण हिशेब सादर करून नगरसेवकांना विश्वासात घ्यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

आता १०० इलेक्ट्रिक बसच्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेताना प्रशासन सीएनजी बसच्या पर्यायाचा आणि खर्चाचा वस्तुनिष्ठ विचार करणार का, याकडे पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.

'कराओके' गायन स्पर्धेचे आयोजन



| चिरनेर | प्रतिनिधी |

संगीताचे उपासक असणाऱ्या उरण तालुक्यातील तरुणाईने गायन क्षेत्रात करियर करण्याच्या उद्देशाने पुढे येत या तरुणाईने या क्षेत्रात स्वतःची वेगळी छाप पाडली आहे. जिल्ह्यातील विविध गीत गायन स्पर्धेत या कलासक्त कलाकारांनी सहभागी होऊन, आपल्या नावाची वेगळी ओळख निर्माण केली असून, त्यांच्या गायकीतून आत्मविश्वासाचा अनोखा संगम पहायला मिळतो. दरम्यान शनिवारी (दि.१७) बोरखार येथे सार्वजनिक नवरात्र उत्सवानिमित्ताने सुरेश डाकी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या कराओके गीत गायन स्पर्धेत उरण तालुक्यातील संगीत गायकांच्या कंठातून सूर बाहेर पडले. आणि रसिकजन मंत्रमुग्ध झाले. या स्पर्धेत यशस्वी ठरणाऱ्या चिरनेर (कातळपाडा) येथील सुरज कमळाकर पाटील यांना प्रथम पारितोषिकाने मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. मोठेभोमची लहान वयातील गायिका प्रांजल हरेश पाटील हिला द्वितीय क्रमांकाच्या पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. तर चिरनेर कातळपाड्यातील नवोदित गायक राजा बैकर हा तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला. यशस्वी गीत गायक स्पर्धकांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या परीक्षकांनी परीक्षणाचे काम पाहिले.

तलावातील गाळ उपसा करा'

| पनवेल | प्रतिनिधी |

खारघर, तळोजा, कळंबोली, कामोठे आणि पनवेल परिसरातील तीव्र पाणीटंचाई दूर करण्यासाठी खारघरमधील ओवे कॅम्प परिसरातील दुर्लक्षित तलावाची स्वच्छता करून गाळ उपसा करावा आणि स्थानिकांसाठी जलसाठा उपलब्ध करावा, अशी मागणी शिवसेना (उबाठा) पक्षाचे बबन पाटील यांनी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. परिसरात नवीन गृहप्रकल्प उभे राहत असतानाही नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नसल्याने नाराजी वाढत आहे. सिडकोकडून टँकरने अपुरे पडत असून, पाणीटंचाईचा फटका नागरिकांना बसत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याची समस्या कायमस्वरूपी सुटेपर्यंत सिडकोने नवीन बांधकामांना प्रारंभ प्रमाणपत्र आणि भोगवटा प्रमाणपत्र देण्यास स्थगिती द्यावी, अशी मागणीही पाटील यांनी केली.

आरोग्य तपासणी शिबीर



| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

वाढदिवसाचा आनंद रुग्णसेवेतून साजरा करत साई द्वारका क्लिनिकचे संचालक डॉ. हेमंत रोहिदास पाटील यांनी आयोजित केलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त रविवारी (दि. १८) सेक्टर ३४ मधील मानसरोवर कॉम्प्लेक्स येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा कामोठे परिसरातील शेकडो नागरिकांनी मधुमेह, थायरॉईडसाठी टीएसएच तपासणी आणि ईसीजी अशा विविध आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या.

याप्रसंगी रवींद्र जोशी, डॉ. अरुणकुमार भगत, शीला भगत, डॉ. हेमलता गोबारी, प्रदीप भगत, विजय चिपळेकर, प्रकाश पाटील, संजय पाटील, शेखर जगताप, सुधीर काटमोरे, अनिल शेट्टी, दशरथ शिंदे, लक्ष्मण चिखले, मोहन पोटे, अमित पानसांडे यांच्यासह राजकीय, सामाजिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

वहाळ येथे 'काव्य संमेलन'

| उरण | प्रतिनिधी |

नवी मुंबई वहाळ येथील दापोलकर परिवारातर्फे नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून एका दिमाखदार आणि भव्य काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनात नामवंत कवी आणि कवयित्रींनी आपल्या बहारदार रचनांनी उपस्थित रसिकांची मने जिंकून घेतली, ज्यामुळे नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणीत झाला. काव्य संमेलनाचे आयोजन काव्य दरबार उरण, आगरी विकास मंच नवी मुंबई, को.म.सा.प. रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. प्रकाश ठाकूर, मिनल माळी, हरिश्चंद्र माळी, पुंडलिक म्हात्रे, रेश्मा ठाकूर यांनी आपली हजेरी लावली होती. नवरात्रीच्या पावन पर्वात सांस्कृतिक आणि साहित्यिक मूल्यांची जपणूक करणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client has entered into negotiations with Ashwin Subodh Mahadik, Subodh Manohar Mahadik, Rashmi Subodh Mahadik and Suraj Subodh Mahadik ("Owners") who are the owners of the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and is proposing to purchase/ acquire all the rights, title and interest in the said Property. Therefore, on instructions, I am issuing this public notice as under:

All persons entities, including any lender, bank or financial institution or entity having any claim and/ or demand and/or objection against or in respect of the right, title, share or interest of the Owners in / to the Property or any part thereof, in furtherance to or under any sale, transfer, assignment, gift, exchange, lease, leave and license, tenancy, possession, use, occupation, trust, maintenance, easement, acquisition, requisition, power of attorney, lis pendens, mortgage, lien, charge, hypothecation (including by way of receivables), pledge, guarantee, loans, debts, advances, inheritance, devise, bequest, partition, settlementor under any attachment, injunction, decree, order, judgment, or award by any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration or under any agreement, memorandum of understanding, term sheet and/or any other deed or document (either agitated in any litigation or otherwise) or any claim or demand which is adverse to or inconsistent with the right, title or interest of the Owner or even otherwise any other right, title, demand, claim or interest whatsoever to or in respect of or concerning the Property or any part thereof ("Claim") are hereby required to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:
(Description of the Property)

All that piece and parcel of the land admeasuring 1.30.20 Akak H.R. Sq. Mtrs. including right of access land admeasuring 0.05.00 Akak H.R. Sq. Mtrs. from and out of the land admeasuring 2.70.00 Akak H.R. Sq. Mtrs., Assessing at Rs. 2.19 Ps. along with a (i) right of access through Gat Kramank / Upavibhag 79/4/1 admeasuring 0.06.60 Akak H.R. Sq. Mtrs. standing in the name of the Owner No. 3, ie. Subodh Manohar Mahadik and (ii) right of access admeasuring 0.09.80 Akak H.R. Sq. Mtrs. from the same land which is standing in the name of the Owners, out of total land bearing Gat Kramank and Upavibhag 79/2 admeasuring 4.70.00 Akak H.R. Sq. Mtrs., Assessing at Rs. 3.82 Ps. along with structures standing thereon, all being, lying and situate at Aadi, Taluka Murud and District Raigad.

Adv. S. Y. Bartake
Adv. S. S. Bartake
Office At B/202, Kuberakshe
CH.S., Near Maruti Naka,
Alibag, Tal. Alibag, Dist. Raigad, 402 201.

फातिमा मातेची ९१ वी तीर्थयात्रा उत्साहात

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जतमधील ख्रिश्चन धर्मियांचे प्रार्थना मंदिर (चर्च) गेल्या काही दशकांपासून फातिमा माऊलीच्या नावाने प्रसिद्ध आहे. प्रत्येक वर्षी १३ ऑक्टोबर किंवा त्या नंतर येणाऱ्या रविवारी या मातेची तीर्थयात्रा असते. यंदा फातिमा मातेची ९१ वी तीर्थयात्रा उत्साहात संपन्न झाली. सकाळी फातिमा मातेच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मराठी धार्मिक उपासना व प्रार्थना तसेच कोंकणी धार्मिक उपासना व प्रार्थना करण्यात आली.

यावेळी ख्रिश्चन धर्मियांबरोबरच अन्य धर्मीय भाविकांनीही जागोजागी



● (छायाचित्र संजय गायकवाड)

मातेच्या पुतळ्यावर फुलांचा वर्षाव केला. कर्जतच्या इतिहासात पहिल्यांदा भाविकांसाठी तामिळ भाषेत आणि मल्ल्याळम भाषेत धार्मिक उपासना व प्रार्थना करण्यात आली. आरोग्य दान प्रार्थना, ख्रिश्त शरीर आराधना व प्रार्थना करून समारंभाचा समारोप करण्यात आला.

याप्रसंगी विल्सन पानपाटील, सिल्व्हर फ्रान्सिस, ॲड. सनी डिमेलो, साधवा पानपाटील, जेनी फ्रान्सिस, नेल्सन फ्रान्सिस, संगीता भोईर, सॅविओ फ्रान्सिस, सिमरन फ्रान्सिस, रॉकी फ्रान्सिस, शाव्हियो फ्रान्सिस आदीं सह देश विदेशातून असंख्य बांधव भगिनी उपस्थित होते.

डिझेलची चोरी

नवीन पनवेल : ट्रेलर मधून डिझेलची चोरी केल्याप्रकरणी अज्ञात इसमाविरोधात १६ ऑक्टोबर रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. इंद्रेश साहू याने १८ चाकी ट्रेलर तळोजा एमआयडीसी येथे पार्क केला होता यावेळी ट्रेलरमधून ३९ हजार रुपये किमतीचे ४०० लिटर डिझेलची चोरी करण्यात आली.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client has entered into negotiations with Ashwin Subodh Mahadik, Rashmi Subodh Mahadik, Subodh Manohar Mahadik and Suraj Subodh Mahadik ("Owners") who are the owners of the property more particularly described in the First Schedule here under written ("Property") and is proposing to purchase/ acquire all the rights, title and interest in the said Property. Therefore, on instructions, I am issuing this public notice as under:

All persons entities, including any lender, bank or financial institution or entity having any claim and/ or demand and/or objection against or in respect of the right, title, share or interest of the Owners in / to the Property or any part thereof, in furtherance to or under any sale, transfer, assignment, gift, exchange, lease, leave and license, tenancy, possession, use, occupation, trust, maintenance, easement, acquisition, requisition, power of attorney, lis pendens, mortgage, lien, charge, hypothecation (including by way of receivables), pledge, guarantee, loans, debts, advances, inheritance, devise, bequest, partition, settlementor under any attachment, injunction, decree, order, judgment, or award by any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration or under any agreement, memorandum of understanding, term sheet and/or any other deed or document (either agitated in any litigation or otherwise) or any claim or demand which is adverse to or inconsistent with the right, title or interest of the Owner or even otherwise any other right, title, demand, claim or interest whatsoever to or in respect of or concerning the Property or any part thereof ("Claim") are hereby required to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:
(Description of the Property)

All that piece and parcel of the land admeasuring 1.39.80 Akak H.R. Sq. Mtrs. including right of access land admeasuring 0.04.80 Akak H.R. Sq. Mtrs. from and out of the land admeasuring 2.70.00 Akak H.R. Sq. Mtrs., Assessing at Rs. 2.19 Ps. along with a (i) right of access through Gat Kramank / Upavibhag 79/4/1 admeasuring 0.06.60 Akak H.R. Sq. Mtrs. standing in the name of the Owner No. 3, ie. Subodh Manohar Mahadik and (ii) right of access admeasuring 0.09.80 Akak H.R. Sq. Mtrs. from the same land which is standing in the name of the Owners, out of total land bearing Gat Kramank and Upavibhag 79/2 admeasuring 4.70.00 Akak H.R. Sq. Mtrs., Assessing at Rs. 3.82 Ps. along with structures standing thereon, all being, lying and situate at Aadi, Taluka Murud and District Raigad.

Adv. S. Y. Bartake
Adv. S. S. Bartake
Office At B/202, Kuberakshe
CH.S., Near Maruti Naka,
Alibag, Tal. Alibag, Dist. Raigad, 402 201.

मराठी माझी देवालाही आवडे कार्यक्रम उत्साहात

| पनवेल | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि पनवेल तालुका पत्रकार विकास मंच यांच्यावतीने मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याच्या दुसऱ्या वर्धापन दिनाचे औचित्याने मराठी माझी देवालाही आवडे या संत गीतांचे आयोजन शनिवारी (दि.१७) ऑक्टोबर रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांचा सन्मान करण्यात आला. कल्पिता राणे यांच्या संकल्पनेतून सादर करण्यात आलेल्या कार्यक्रमात मराठी भाषेच्या अभिजात प्रवासाचा लेखाजोखा संतगीते आणि नृत्यांच्या माध्यमातून रसिक प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आला. अत्यंत बहारदार झालेल्या कार्यक्रमाचा पनवेलकरांनी मनमुराद आनंद लुटला. डॉ. राम पंडित आणि तन्वी गोरे यांच्या सुमधुर गायनाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.कल्पिता राणे यांनी प्रत्येक गीताला समर्पक नृत्याचा साज चढविल्याने कार्यक्रमाने एक अनोखी उंची गाठली. या कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अडॅ. मनोज भुजबळ, आबासाहेब जगताप, माधव पाटील, राजेंद्र पाटील, डॉ. संजय सोनावणे, संजय कदम, मंदार दोंदे, हरेश साठे, दत्ता कुलकर्णी, प्रवीण मोहोकर, नितीन कोळी, निलेश सोनावणे, लालचंद यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

सृष्टी मुंबईकर नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित

| उरण | प्रतिनिधी |

महिलांच्या अंगभूत कौशल्याचा त्यांच्या संघर्षमय प्रवासाचा सन्मान करणारा आणि नव्या पिढीला प्रेरणेची दिशा देणारा नवदुर्गा सन्मान सोहळा २०२६ उरण येथील गुरुकुल कॅडमी, आधार फाऊंडेशन सार्वजनिक नवरात्र उत्सव २०२६ यांच्या सौजन्याने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात आपल कर्तुत्व सिद्ध करून समाजाच्या उन्नतीसाठी आपला वेळ, ऊर्जा, आणि नेतृत्व समर्पित करणाऱ्या महिलां भगिनींचा अर्थात नवदुर्गांचा सन्मान करण्यात आला. त्यात वेश्वी गावाची सृष्टी मुंबईकर ही



मेरीटाईम क्षेत्रातील मर्चंड नेव्हीमध्ये देशभरातून तब्बल ४,५०० मुलींमधून ३९ मुलींना निवडण्यात आले त्यात अथांग सागराला गवसणी घालत आपल्या कवेत सामावून घेणारी रायगडची सागरी कन्या सृष्टी मुंबईकर हिची निवड करण्यात आली. तिच्या कर्तृत्ववान उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन उरण नगर परिषदेच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या पुढाकारातून गुरुकुल कॅडमी तसेच आधार सावली फाऊंडेशन सार्वजनिक नवरात्र उत्सव यांच्या सौजन्याने नवदुर्गा सन्मान २०२६ हा मानाचा पुरस्कार सन्मान करण्यात आला.

प्रवाशाचा मोबाईल केला परत

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत स्थानकातील रेल्वे सुरक्षा दलाच्या जवान यांनी उपनगरीय लोकल सेवा यांच्या बंदोबस्तात असताना सापडलेला महागडा मोबाईल संबंधित प्रवाशाला परत केला. रेल्वे सुरक्षा दलाचे जवान सचिन तारोळे यांच्या कार्यतत्परता त्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

आरपीएफच्या कार्यामुळे रेल्वे सुरक्षा दलाच्या कर्तव्यतत्परतेचे दर्शन घडले आहे. तसेच, लोकलमध्ये सापडलेला मोबाईल संबंधित कर्मचाऱ्यांकडे सुपूर्द करणाऱ्या अनंता डांगरे यांच्या प्रामाणिकपणाचेही कौतुक होत आहे. या घटनेतून हरवलेल्या वस्तूंबाबत योग्य वेळी संबंधित रेल्वे सुरक्षा यंत्रणेशी संपर्क साधण्याचे आणि सापडलेल्या वस्तू प्रामाणिकपणे परत करण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

तसेच कर्जत रेल्वे सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्याने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. रणवीर सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन बाळू तरोळे यांनी कर्जत रेल्वे स्थानकातील ईएमयू स्थानकात जाऊन संबंधित लोकलची पाहणी केली. यावेळी शेलू येथील प्रवासी अनंता डांगरे यांना लोकलमध्ये सापडलेला मोबाईल मिळाला होता. त्यांनी कोणताही गैरप्रकार न करता तो मोबाईल सचिन तरोळे यांच्या स्वाधीन केला.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

पनवेल महानगरपालिका
दरपत्रके मागविण्याबाबत

पनवेल शहरातील एकूण १२ राष्ट्रीय पुरूषांच्या पुतळ्यांना नियमितपणे पुष्पहार घालणे व आवश्यकतेनुसार शासकीय परिपत्रकानुसार जयंतीस, पुष्पतोरण, पुष्पमाळ नमुन्याप्रमाणे पुरविणेबाबतचा दरकरार करणेकामी अंदाजपत्रक तयार करण्याकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.panvelcorporation.com या वेबसाईटवर व भांडार विभागात उपलब्ध आहे.

जा.क्र. : पमपा/भांडार/२९२६/७४७/२०२६ सही/-
दिनांक : १४/०८/२०२६ **(अभिषेक पराडकर)**
उपआयुक्त (भांडार)
पनवेल महानगरपालिका

निवडक



कबड्डी स्पर्धेत पीएनपी काकळघर माध्यमिक शाळेच्या मुली प्रथम

रेवदंडा : पनवेल येथील शिवडुंग परिसरात पार पडलेल्या रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा २०२६-२७ मध्ये मुरुड तालुक्यातील काकळघर येथील पी. एन. पी. माध्यमिक शाळेच्या मुलींनी उल्लेखनीय कामगिरी करत १४ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. ग्रामीण भागातील या शाळेच्या विद्यार्थिनींनी जिल्हास्तरावर मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.जिल्हास्तरीय स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत मजल मारत विद्यार्थिनींनी आपल्या खेळातील कौशल्य, जिद्द, चिकाटी आणि सांघिक समन्वयाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. त्यांच्या या यशामुळे काकळघर परिसरासह मुरुड तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशाबद्दल संस्थेच्या संस्थापक कार्यवाह चित्रलेखा पाटील, शाळा समितीचे चेअरमन संतोष कांबळी, सीताराम ठाकूर, ॲड. सुरेश नांदगावकर सर तसेच शाळेचे मुख्याध्यापक मनोज सुर्वे यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थिनींच्या कामगिरीचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मुंबई इंडियन्सला शोधावा लागणार नवा प्रशिक्षक

मुंबई : महेला जयवर्धनेने मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक पद सोडले आहे. जयवर्धने मुंबई इंडियन्स सोबतच्या आपल्या दुसऱ्या टर्ममध्ये गेल्या दोन हंगामात संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहिलं होते. यापूर्वी त्याने २०१७ ते २०२२ पर्यंत मुंबई इंडियन्सचे प्रशिक्षक पद निभावली होतं. मुंबई इंडियन्सने प्रेस रिलीजमध्ये सांगितलं की, मुंबई इंडियन्स आज घोषणा करत आहे की महेला जयवर्धने आपले मुख्य प्रशिक्षकाचे पद सोडत आहे. वन फॅमिलीसोबतची त्यांची एक दशकाची साथ आता संपुष्टात येणार आहे. मुंबई इंडियन्समध्ये मोलाची भूमिका जयवर्धनेने मुख्य प्रशिक्षक म्हणून मुंबई इंडियन्सला तीन आयपीएल टायटल मिळवून देण्यात मोलाची भूमिका निभावली होती. मुंबई इंडियन्सने जयवर्धनेने त्यांच्या फ्रेंचायजीचे कल्चर तयार करणे आणि मुख्य प्रशिक्षक म्हणून आपल्या कार्यकाळात शिस्त, सहकार्य आणि संघ प्रथम हा अप्रोच निर्माण केला. जयवर्धनेने पुन्हा मुंबई इंडियन्स का सोडली? आता मुंबईचा पुढचा प्रशिक्षक कोण असणार हे प्रश्न आता उपस्थित झाले आहेत. जयवर्धने मुंबई इंडियन्ससोबत जवळपास एक दशक आहे. त्या काळात त्याला खेळाडू, कोचिंग स्टाफ, चाहते आणि फ्रेंचायजी मालक नीता आणि आकाश अंबानी यांचा पाठिंबा आणि विश्वास मिळाल्याबद्दल आभार मानले आहेत.जयवर्धने म्हणाला, मुंबई इंडियन्स गेल्या एका दशकापासून माझ्या प्रवासाचा एक महत्वाचा भाग राहिला आहे. खेळाडू, कोचिंग स्टाफ, वन फॅमिलीचा जबरदस्त पाठिंबा आणि चाहत्यांचा असा अनुभव मिळाला आहे. तो आयुष्यभर सांभाळून ठेवणार आहे.

भुवनेश्वरच्या नावावर अनोख्या विक्रमाची नोंद

नवी दिल्ली : भारतीय क्रिकेट संघात निवड होणे हा एक बहुमानच. साहजिकच ही निवड गुणवंत क्रिकेटपटूंचीच होते. मात्र यानंतर संघात आपलं स्थान टिकवणे ही कठीण बाब आहे. मात्र महाकठीण बाब म्हणजे खराब कामगिरीमुळे संघातून पत्ता कट झाल्यानंतर पुन्हा कमबॅक करणे. आता हे महाकठीण आव्हान टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार याने पेललं. त्याने आयपीएलमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत स्वतःला सिद्ध केले. निवड समितीला त्याच्या कामगिरीची दखल घेणे भाग पडलं. आता सुमारे चार वर्षांनंतर त्याचा भारताच्या टी-२० संघात समावेश झाला आहे. शनिवारी बेंगळुरू येथे वेस्ट इंडिजविरुद्धच्या पाचव्या आणि शेवटच्या टी-२० सामन्यात त्याने भारतीय टी-२० संघात पुनरागमन केले. यामुळे आता एक अनोखा विक्रम त्याच्या नावावर झाला आहे. भुवनेश्वर कुमारचे टीम इंडियात पुनरागमनशनिवारी बेंगळुरू येथे वेस्ट इंडिजविरुद्धच्या पाचव्या आणि अंतिम टी-२० सामन्यात भुवनेश्वर भारताच्या अंतिम ११ खेळाडूंमध्ये सामील होता. पावसामुळे हा सामना ९-९ षटकांचा झाला, मात्र खराब हवामानामुळे अखेर सामना रद्द करावा लागला. भुवनेश्वरला बेंगळुरूमध्ये गोलंदाजीची संधी मिळाली नाही. आता तो २२ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या न्यूझीलंड दौऱ्यावरील टी-२० मालिकेत खेळताना दिसणार आहे. सर्वाधिक टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या अंतरानंतर पुनरागमन करणारा भुवनेश्वर कुमार हा पहिला भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे.

दिल्ली हाफ मॅरेथॉनमध्ये केनियाचा डंका

४० हजार धावपटूंचा सहभाग; भारतीय गटात शैलेश आणि अंकिताची बाजी

| दिल्ली | वृत्तसंस्था |

वेदांता दिल्ली हाफ मॅरेथॉन २०२६ मध्ये केनियाच्या चार्ल्स मातातने पुरुषांच्या एलिट गटात कोर्स रेकॉर्ड मोडत ऐतिहासिक काम गिरी केली. त्याने ५८ मिनिटे ५२ सेकंदांत शर्यत पूर्ण केली. महिलांच्या एलिट गटात इथिओपियाच्या वुदिनेश एलेमूने १ तास ६ मिनिटे ३५ सेकंदांची वेळ नोंदवत विजेतेपद पटकावले. 'वर्ल्ड ॲथलेटिक्स गोल्ड लेबल' दर्जाच्या या स्पर्धेत राष्ट्रीय राजधानीतील रस्त्यांवर सुमारे ४० हजार धावपटू सहभागी झाले.

माताताने नोंदवलेली वेळ त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीही ठरली. पुरुषांच्या शर्यतीत केनियाच्याच सॅमवेल न्यामाई माइलूने दुसरे, तर स्टॅनली वैथाका म्बुरूने तिसरे स्थान मिळवले. त्यामुळे पुरुषांच्या एलिट गटातील तिन्ही पदके केनियाच्या धावपटूंनी पटकावली.

महिलांच्या एलिट गटात इथिओपियाच्या एलेमूने आपल्याच देशाच्या सेला बुसिनेईला मागे टाकत विजेतेपद मिळवले. केनियाच्या सिंथिया चेलंगात चेपक्रोनीने तिसरे स्थान पटकावले. भारतीय एलिट गटात पुरुषांमध्ये शैलेश कुशवाहा, तर महिलांमध्ये अंकिता ध्यानी यांनी विजेतेपद मिळवले.

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि वेदांता समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण मिश्रा यांनी स्पर्धेला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी व्हाइस ॲडमिरल अतुल आनंद उपस्थित होते. एलिट हाफ मॅरेथॉनसह मास पार्टिसिपेशन हाफ मॅरेथॉन, पोलीस कप, 'चॅम्पियन्स विथ डिसॅबिलिटी', ज्येष्ठ नागरिकांची धाव, ओपन १० किलोमीटर आणि 'ग्रेट दिल्ली रन' अशा विविध गटांतील शर्यतीही पार पडल्या. या वर्षीच्या स्पर्धेत 'रन फॉर झिरो हंगर' या उपक्रमालाही जोड देण्यात आली. सहभागी धावपटूंच्या माध्यमातून यंदा ५० लाख भोजन उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले. मागील पाच आवृत्त्यांमध्ये या अभियानांतर्गत एकूण २.७ कोटींहून अधिक भोजन उपलब्ध करून देण्यात आले आहे. वेदांता समूहाच्या दिल्ली हाफ मॅरेथॉनशी असलेल्या सहभागाची पाच वर्षे पूर्ण झाल्याचेही हे वर्ष विशेष ठरले.

वेदांता समूहाच्या नॉन-एक्झिक्युटिव्ह संचालक आणि हिंदुस्तान झिंक लिमिटेडच्या अध्यक्ष प्रिया अग्रवाल हेब्बर म्हणाल्या, ४० हजार धावपटू रस्त्यावर उतरल्याने दिल्ली हाफ मॅरेथॉनने क्रीडा उत्कृष्टता, वैयक्तिक दृढनिश्चय आणि सामूहिक प्रयत्नांच्या ताकदीचा उत्सव साजरा केला. आघाडीच्या खेळाडूंपासून ते पहिल्यांदाच धावणाऱ्या सहभागींपर्यंत प्रत्येकाने खेळ आपल्याला स्वतःसाठी आणि इतरांसाठी काहीतरी चांगले करण्याची प्रेरणा कशी देऊ शकतो, हे दाखवून दिले. सीमा सुरक्षा दलानेही या स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. दलाच्या स्थापनेची ६१ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त ६१ पुरुष आणि ६१ महिला कर्मचाऱ्यांनी या प्रतिष्ठित स्पर्धेत भाग घेतला. बीएसएफ आणि 'बॉर्डर सिक्युरिटी फोर्स वाइव्स वेल्फेअर असोसिएशन'च्या सदस्यांसह सुमारे १३० जण सहभागी झाले.





मेरी कोम व टेनिसपटू महेश भूपतींचा पाठिंबा

बॉक्सिंगपटू मेरी कोम, पॅरालिम्पिक बॅडमिंटन विजेता प्रमोद भगत आणि टेनिसपटू महेश भूपती यांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला. आघाडीचे खेळाडू आणि हौशी धावपटू यांच्या सहभागामुळे या स्पर्धेत क्रीडा उत्कृष्टतेसोबतच सर्वसमावेशक सहभागाचे दर्शन घडले.

१६ डिसेंबरला गोव्यात आयपीएलचा लिलाव

| मुंबई | प्रतिनिधी |

इंडियन प्रीमियर लीगच्या आगामी हंगामाच्या लिलावाची तारीख निश्चित झाली आहे. यापूर्वी हा लिलाव गोव्यातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये होणार होता. आयपीएल २०२७ चा लिलाव १६ डिसेंबर रोजी गोव्यातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये होणार आहे.

लिलावाचे ठिकाण आणि तारखेसंदर्भात फ्रँचायझी मालकांना किंवा सीईओना अद्याप कोणताही औपचारिक ईमेल पाठवण्यात आलेला नाही. बीसीसीआयने एका व्हॉट्सॲप संदेशात म्हटले आहे की, आयपीएल २०२७ साठी खेळाडूंचा लिलाव १६ डिसेंबर २०२६ रोजी गोव्यातील आयटीसी ग्रँड येथे होणार आहे. लिलावासंदर्भात १५ डिसेंबर २०२६ रोजी एक माहिती सत्र आयोजित केले जाईल. अनेक आयपीएल फ्रँचायझींनी क्रिकबझला दुजोरा दिला आहे की, त्यांना हा संदेश मिळाला आहे.

अहवालानुसार, संघांना लॉजिस्टिकल व्यवस्था करण्यास आणि गोव्याला जाण्यासाठी प्रवास बुक करण्यास मदत व्हावी म्हणून हा संदेश पाठवण्यात आला होता. तारखेत बदल होऊ शकतो की नाही हे अद्याप स्पष्ट नसले तरी, योग्य वेळी आयपीएल संघांच्या मालकांना आणि सीईओंना एक अधिकृत सूचना पाठवली जाण्याची शक्यता आहे.

मागील तीन आयपीएल लिलाव दुबई, जेद्दाह आणि अबू धाबी येथे परदेशात पार पडले होते. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी पुष्टी केली की, अलिकडच्या काळात परदेशात झालेल्या स्पर्धांनंतर स्पर्धेचे ठिकाण पुन्हा भारतात हलवण्याची मंडळाची इच्छा आहे. आयपीएल मिनी लिलावासारखा छोटा कार्यक्रम देशांतर्गत आयोजित करणे आणि त्याचे व्यवस्थापन करणे सोपे आहे.

न्यूझीलंड मालिकेपूर्वीच गिलवर नामुष्की

| मुंबई | प्रतिनिधी |

न्यूझीलंडच्या सहा आठवड्यांच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी, भारतीय कर्णधार शुभमन गिलचे रणजी ट्रॉफीमधील पुनरागमन निराशाजनक ठरले. रविवारी न्यू चंदीगड येथील मुल्लानपूर स्टेडियमवर छत्तीसगडविरुद्ध पंजाबकडून खेळताना गिल स्वस्तात बाद झाला. लाल चेंडूने सामन्याचा सराव आणि लय मिळवण्यासाठी चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला हा गिल केवळ एका धावेवर क्लीन बोल्ड झाला.

क्रिकेटमध्ये क्रांती!

पुरुष अन् महिला खेळाडू एकाच संघातून खेळणार

| मुंबई | प्रतिनिधी |

क्रिकेट म्हटलं की पुरुष आणि महिला संघांचे सामने वेगवेगळे पाहायला मिळतात. पण आता मैदानावर मुलं आणि मुली एकाच संघातून खेळताना दिसणार आहेत. एवढंच नाही, तर एका खेळाडूच्या कामगिरीचा परिणाम दुसऱ्या खेळाडूच्या विजयावरही होणार आहे. क्रिकेटच्या पारंपरिक चौकटीबाहेरचा हा अनोखा प्रयोग श्रीलंकेत होणार असून, त्याचं नाव टेस्ट ट्वेंटी असं ठेवण्यात आलं आहे.

श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथील सिंहलीज स्पोर्ट्स क्लबमध्ये १४ ते २९ नोव्हेंबरदरम्यान ही स्पर्धा खेळवली जाणार आहे. ८० षटकांच्या या फॉरमॅटमध्ये मुलं आणि मुली एकत्र खेळतील. क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारच्या स्पर्धेचं आयोजन केलं जात असल्याचा आयोजकांचा दावा आहे.या स्पर्धेत जगभरातील १३ ते २१ वयोगटातील १६० युवा क्रिकेटपटू सहभागी होतील. त्यांची चार महाद्वीपीय संघांमध्ये विभागणी केली जाणार आहे. प्रत्येक संघात २० मुलं आणि २० मुली, असे एकूण ४० खेळाडू असतील. या स्पर्धेचं वैशिष्ट्य म्हणजे मुलं आणि मुली स्वतंत्र संघ म्हणून खेळणार नाहीत. दोघांच्या कामगिरीचा परिणाम एकाच संघाच्या निकालावर होईल.

दिवसा लाल चेंडू, रात्री पांढरा चेंडू

या स्पर्धेतील सामने एका दिवसात पूर्ण होतील. एकूण ८० षटकांचा खेळ दोन भागांत विभागला जाईल. सुरुवातीची ४० षटकं दिवसा लाल चेंडूने आणि पांढऱ्या कपड्यांत खेळली जातील. त्यानंतर रंगीत कपडे घालून फ्लडलाइट्सच्या प्रकाशात पांढऱ्या चेंडूने उर्वरित ४० षटकांचा खेळ होईल. प्रत्येक संघाला दोनदा फलंदाजी करण्याची संधी मिळेल. पहिल्या सत्रात केलेल्या धावा संघाच्या एकूण धावसंख्येत कायम राहतील. त्यामुळे दिवसा मिळवलेली आघाडी रात्रीच्या खेळातही महत्त्वाची ठरेल.

पॅरिटी रूल ठरणार खास

या स्पर्धेतील सर्वात वेगळा नियम म्हणजे 'पॅरिटी रूल' यानुसार मुलं आणि मुलींच्या कामगिरीचा एकमेकांच्या विजयाशी संबंध जोडला जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक खेळाडूची खेळी संघाच्या निकालासाठी महत्त्वाची ठरेल. मात्र, या नियमाची अचूक गुणपद्धती आणि सामन्याचा निकाल ठरवण्याची प्रक्रिया समजण्यासाठी आयोजकांचे सविस्तर नियम महत्त्वाचे असतील. या स्पर्धेच्या सल्लागार समितीत दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार एबी डिव्हिलियर्स, ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू मॅथ्यू हेडन आणि वेस्ट इंडिजचे महान कर्णधार सर क्लाइव्ह लॉयड यांचा समावेश आहे. दिल्लीचे क्रिकेट प्रशिक्षक राजकुमार शर्मा जागतिक निवड समितीचं नेतृत्व करतील.

कृणाल पांड्याकडे टीम इंडियाची कमान

| हाँगकाँग | वृत्तसंस्था |

हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेपूर्वी भारतीय संघात एक मोठा बदल झाला आहे. काही दिवसांपूर्वी या स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली होती. अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारला कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले होते. परंतु, भुवनेश्वर भारतीय टी २० संघात सामील झाला असून तो न्यूझीलंड दौऱ्यात व्यस्त असेल. यामुळे, तो हाँगकाँग सिक्सेसमध्ये सहभागी होऊ शकणार नाही. त्याच्या जागी कृणाल पांड्याची नियुक्ती करण्यात आली आहे.



इतकेच नाही, तर भुवनेश्वरच्या बदली खेळाडूचीही अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

हाँगकाँग सिक्सेस २०२६ साठी भारतीय संघाची घोषणा झाली, तेव्हा भुवनेश्वर कुमारकडे संघाची कमान सोपवण्यात आली होती. परंतु यानंतर, बीसीसीआयने न्यूझीलंडविरुद्धच्या टी आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली. यामध्ये भुवनेश्वर कुमारचाही समावेश होता. भारत-न्यूझीलंड मालिका २२ ऑक्टोबरला सुरू होत आहे, तर सिक्सेस ३० ऑक्टोबरला सुरू होत आहेत. भारतीय वरिष्ठ संघात निवड झाल्यानंतर भुवनेश्वरला सिक्सेसमधून वगळणे निश्चित होते.

हाँगकाँग क्रिकेटने आता अधिकृतपणे जाहीर केले आहे की, कृणाल पांड्या भारतीय संघाचे कर्णधारपद भूषवेल. एका निवेदनात कृणाल म्हणाला की, हाँगकाँग नमस्कार. मी कृणाल पांड्या, भारतीय संघाचा कर्णधार आहे. तीन दिवसीय स्पर्धेत बारा संघ एका ट्रॉफीसाठी स्पर्धा करतील. ही ट्रॉफी जिंकण्यासाठी आलो आहोत. सामने प्रत्येकी सहा षटकांचे असतील.

पुण्याच्या अकतसुकी संघाने विजेतेपद पटकावले

| पुणे | प्रतिनिधी |

पीडीएफए लेजेंड्स करंडक प्रौढ गटाच्या फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत पुण्याच्या अकतसुकी संघाने मुंबईच्या चेंबुर ओएस संघाचा टायब्रेकमध्ये पराभव करून विजेतेपद संपादन केले.

वानवडी येथील टर्फ-अप मैदानावर झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाला. सामन्याच्या ९ व्या मिनिटाला सुरज शेट्टी याने गोल करून चेंबुर संघाचे खाते उघडले. त्यानंतर अनुप नायर याने गोल करून अकतसुकी संघाला बरोबरी गाठून दिली. कृष्णा नायडू याने गोल करून चेंबुर संघाला पुन्हा आघाडीवर नेले. जेसन वाझ याने गोल करून अकतसुकी संघाला बरोबरी गाठून दिली. पूर्ण वेळ ही बरोबरीची कोंडी कायम असल्याने टायब्रेकपद्धतीचा अवलंब करण्यात आला. टायब्रेकमध्ये चेंबुर ओएसकडून कृष्णा नायडू याने तर अकतसुकी संघाकडून विजयान अर्लंड आणि शनुप नायर यांनी गोल नोंदवले.

जॅक मॅकगर्कची १४ चेंडूंत फिफ्टी अन् १९ चेंडूंत ९६ धावा

| सिडनी | वृत्तसंस्था |

ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू जॅक फ्रेजर मॅकगर्कनं ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या वनडे कपमध्ये १४ चेंडूत अर्धशतक केलं. तर १२२ धावांची वादळी खेळी केली. यात त्यानं १० चौकार आणि ९ उत्तुंग षटकार मारले. मॅकगर्कने त्याचं शतकही फक्त ४९ चेंडूत झळकावलं. पण त्याला लिस्ट एमध्ये सर्वात वेगवान अर्धशतकाचा वैभव सूर्यवंशीचा विक्रम मोडता आला नाही.

जॅक फ्रेजर मॅकगर्कने त्याची ही वादळी खेळी वनडे कपमध्ये साउथ ऑस्ट्रेलियाविरुद्ध क्रिन्सलँड बुल्स यांच्यातील सामन्यावेळी खेळली. या खेळीच्या जोरावर साउथ ऑस्ट्रेलियाला चांगली सुरुवात मिळाली. यामुळे संघाची धावसंख्या चांगली झाली असून विरोधी संघासमोर मोठं आव्हान असणार आहे.



भारताचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या नावावर लिस्ट ए मध्ये वेगवान अर्धशतकाचा विक्रम आहे. त्यानं हा कारनामा श्रीलंका ए विरुद्ध केला होता. वैभव सूर्यवंशीने फक्त ११ चेंडूत अर्धशतक केलं होतं. त्या सामन्यात वैभवला शतक झळकावता आलं नव्हतं पण २९ चेंडूत केलेल्या ९४ धावांमुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. वैभव सूर्यवंशीने त्याच्या खेळीत १० चौकार आणि ८ षटकार मारले होते.

सर्वात कमी चेंडूत अर्धशतक करणाऱ्यांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर रागामाचा कौशल्य वीररत्ने आहे. त्यानं २००५-०६मध्ये १२ चेंडूत अर्धशतक झळकावलं होतं. तर थिसारा परेरानं १३ चेंडूत आणि रोरी क्लेनवेल्टनं १४ चेंडूत एकदिवसीय सामन्यात अर्धशतक ठोकलं होतं. ऑस्ट्रेलियाचा जॅक फ्रेजर मॅकगर्कचा टॉप ५ फलंदाजांच्या यादीत समावेश झाला.

इशान किशनचा विक्रमी झंझावात | शे होप याचा मालिकावीर म्हणून गौरव

सामना रद्द, मालिका बरोबरीत

| मुंबई | प्रतिनिधी |

भारत आणि वेस्ट इंडिजमधील पाचवा टी-२० सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सामना सुरू होण्याआधीपासून पावसाने आपली बॅटिंग सुरू ठेवलीी होती, पण पावसाने काहीसा विसावा घेतल्यावर ९.१५ वाजता सामना ९ ओव्हरचा करण्यात आला होता. भारतीय संघ बॅटिंग उतरला आणि आक्रमक सुरूवात केली होती पण भारताच्या संपूर्ण ९ ओव्हरही खेळून झाल्या नाहीत तोवर पावसाने पुन्हा एकदा पावसाने कमबॅक केले आणि सामना रद्द करावा लागला. पण या सामन्यात मुंबई इंडियन्सच्या पक्ष्याने



मैदान गाजवलं, कारण शंभर किंवा दोनशे नाहीतर ४००च्या स्ट्राईक रेटने त्याने कॅरेबियन गोलंदाजांची धुलाई केली.

चिन्नास्वामी स्टेडियमवर अक्षरशः धावांचा पाऊस पाडला. सामना प्रत्येकी ९ ओव्हर्सचा करण्यात आला होता. वेस्ट इंडीजने टॉस जिंकून भारताला पहिल्यांदा फलंदाजीसाठी बोलावलं होतं. भारताची सुरुवात झंझावाती झाली. सलामीवीर संजू सॅमसनने ७ चेंडूत १६ धावा (२ चौकार, १ षटकार) तर अभिषेक शर्माने ४ चेंडूत ६ धावा केल्या. यानंतर आलेल्या इशान किशनने अवघ्या १० चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ३०० च्या स्ट्राईक रेटने ३० धावांची तुफानी खेळी केली. भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातील ५ वा टी-२० सामना पावसामुळे रद्द झाला असला, तरी भारताच्या फलंदाजांनी आमंत्रित केले होते. यानंतर कर्णधार श्रेयस अय्यरने १४ चेंडूत २२ धावा जोडल्या, तर तिलक वर्मा ७ धावांवर आऊट झाला. पण सामन्याचे खरे आकर्षण ठरला तो मुंबई इंडियन्सचा पठ्ठा नमन धीर.

मैदानात येताच वेस्ट इंडीजच्या गोलंदाजांची पिसे काढली. नमन धीरने अवघ्या ६ चेंडूंमध्ये ३ खणखणीत षटकार आणि १ चौकार ठोकून नाबाद २४ धावा कुटल्या. त्याचा स्ट्राईक रेट तब्बल ४०० चा होता. भारताचा डाव ७.४ ओव्हर्समध्ये ५ बाद ११८ धावांवर असताना पुन्हा मुसळधार पाऊस सुरू झाला. वेस्ट इंडीजकडून शमार स्प्रिंगर आणि कीमो पॉल यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. सतत पडणाऱ्या पावसामुळे अखेर पंचांना हा सामना रद्द घोषित करावा लागला. सामना रद्द झाल्यामुळे ५ सामन्यांची ही टी-२० मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली. या मालिकेत शे होप याला मालिकावीर म्हणून गौरवण्यात आले.

सॉकर सामन्यावेळी मैदानात घुसली कार

| कॅन्सस | वृत्तसंस्था |

अमेरिकेतील कॅन्ससमध्ये एका सॉकर सामन्यावेळी एक कार मैदानात घुसली. या दुर्घटनेत एका मुलासह २ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले. ही घटना विचिटा येथील स्ट्रायकर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये घडली.

सामना सुरू असताना दुपारी ३:२५ वाजता कार मैदानात घुसली.विचिटा पोलिसांनी चालकाला तातडीने ताब्यात घेतले. पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, आता त्याच्यापासून सर्वसामान्यांना कोणताही धोका नाही. कारमध्ये २ अल्पवयीन मुलेही होती. दुर्घटनेनंतर कार घटनास्थळीच राहिली.



विचिटा पोलीस विभागाचे आरोन मोसेस यांनी सांगितले की, चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. ते म्हणाले, त्या चालकाकडून आता सामान्य नागरिकांना कोणताही धोका नाही.या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या दोघांमध्ये एका अल्पवयीनाचा आणि एका प्रौढाचा समावेश आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)